| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २८७ वा | शनिवार, दिनांक ०७ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## वाहनाच्या धडकेत पादचारी जखमी

**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील गंजगोलाई परिसरात भरधाव रिक्षाने धडक दिल्याने एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी गांधी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २८ जानेवारी रोजी सकाळी ९:३० च्या सुमारास फिर्यादी मोहम्मद रशीदसाब शेख हे गंजगोलाई परिसरातून जात असताना, आरोपी रिक्षाचालक (एम.एच. २४ ए.टी. ९५०२) याने आपली रिक्षा हयगयीने व वेगाने चालवून फिर्यादीला जोराची धडक दिली. या अपघातात फिर्यादीच्या उजव्या पायाला गंभीर इजा झाली आहे. पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, पोलिस हवालदार नराळे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

## जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

**लातूर/प्रतिनिधी :** रोटरी क्लब लातूर व दयानंद कला महाविद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोबाईल संस्कृती प्रगती की अधोगती या विषयावर जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दयानंद कला महाविद्यालयात करण्यात आले होते. कोव्हिड कालावधी पासून सबंध विद्यार्थी मोबाइलच्या आहारी गेलेले आहेत, यामुळे त्यांच्या शरीर शरीर व मनावर सखोल परिणाम होत चाललेला आहे. याचे गांभीर्य विचारात घेऊन हा विषय ठेवण्यात आला होता. सबंध जिल्हाभरातून ६१ विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली होती.

## शहरात स्वच्छता मोहिमेची मागणी

**लातूर/प्रतिनिधी :** शहर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्यासाठी लातूर महानगरपालिकेने तात्काळ विशेष स्वच्छता मोहीम राबवावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून केली जात आहे. अनेक प्रभागांमध्ये कचरा संकलन अनियमित, नाले तुंबलेले, तसेच सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छतेचे चित्र दिसून येत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेषतः वस्त्या, बाजारपेठा, बसस्थानक परिसर, रुग्णालयांच्या आसपासचे भाग आणि शाळा-महाविद्यालय परिसर येथे स्वच्छतेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे.

## प्रभात किरणे

आम्हा धन नातीगोती
मित्र जिवापाड सांभाळू
हे पवित्र स्वार्थाविना जपू
बंधन अखंड न मिळे
सुख, जरी धन प्रचंड

– इंजि. नागनाथ कलवले, लातूर

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



संपूर्ण जीवनाचा विकास करणे हाच शिक्षणाचा खरा हेतू- पंतप्रधान

## चिमटा



दयाचा

लिलावाच्या जाहीरातीचे बातमीत रूपांतर होत आहे !
नेते मंडळी मोठ्यांना जाहीराती देत आहेत !!
इतर मात्र भरपूर बातम्या छापून मोठी प्रसिध्दी देत आहेत!!

# मुले जातीयवाद घरातूनच शिकतात

### विद्यार्थ्याच्या 'त्या' मीम्सबाबत सुप्रीम कोर्टाने पालकांना झापले!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मुले जातीयवाद घरातूनच शिकतात, जातीयवादी छटा असलेल्या अशा मीम्सना प्रोत्साहन दिले जाऊ नये, अशा शब्दांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने १४ वर्षीय विद्यार्थ्याला शाळेतून काढून टाकण्याच्या निर्णयाविरोधात पालकांनी दाखल केलेल्या याचिकेवर टिप्पणी केली.

इंदूरमधील १४ वर्षीय मुलाने इंस्टाग्राम अकाउंटवरून आक्षेपार्ह मीम्स प्रसारित केले. या मुलाने इतर दोन विद्यार्थ्यांसोबत एक खासगी इंस्टाग्राम खाते तयार केले होते आणि शिक्षकांसाठी आक्षेपार्ह असलेले मीम्स प्रसारित केले होते, ज्यात जातीयवादी छटा असलेला एक मीम देखील होता. या प्रकरणी त्याला शाळेतून काढून टाकण्यात आले होते.

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने वडिलांची याचिका फेटाळून लावत २०२४-२५ च्या इयत्ता नववीच्या शैक्षणिक सत्राच्या मध्यात मुलाला शाळेतून काढून टाकण्याच्या शाळेच्या निर्णयाला कायम ठेवले होते. न्यायालयाने स्पष्ट केले होते की, ही केवळ एका मीमची बाब नाही, तर पोस्ट्सच्या मालिकेची



बाब आहे. त्यामुळे विद्यार्थ्याचे कृत्य ही एक किरकोळ घटना म्हणता येणार नाही. विद्यार्थ्याला त्याच्या कृत्यांचे गांभीर्य स्पष्टपणे समजले होते, त्यामुळे कोणतीही माफी त्याच्या बचावासाठी येऊ शकत नाही. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात वडिलांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

याचिकाकर्त्याच्या वीतने वकील निपुण सक्सेना यांनी युक्तिवादावेळी दावा केला की, मुलाने केलेल्या कृतीसाठी त्याला दिलेली शिक्षा खूपच कडक आणि चुकीची आहे. मुलानेच ते 'मीम्स' (Memes) शेअर केले होते, हे कधीही सिद्ध झालेले नाही. कनिष्ठ न्यायालयाने केवळ गृहीत धरून त्याला दोषी ठरवले. मुलाचा कोणताही वाईट किंवा गुन्हेगारी उद्देश नव्हता. जर अशा कारणावरून शिक्षा दिली, तर शाळांना मुलांच्या खासगी आयुष्यावर आणि फोनवर पाळत ठेवण्याचे अवाजवी अधिकार मिळतील. ज्या इंस्टाग्राम खात्यावरून ते मीम्स शेअर झाले, ते खासगी होते आणि ते एकटा हा मुलगा नाही, तर तिघेजण मिळून चालवत होते. त्यामुळे केवळ याच मुलावर चुकीचा हेतू असल्याचा शिक्का मारता येणार नाही.

**मुले अशा गोष्टी घरातूनच शिकतात**

वडिलांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. मुले या गोष्टी घरातूनच शिकत आहेत. जातीयवादी छटा असलेल्या अशा मीम्सना प्रोत्साहन दिले जाऊ नये, अशी टिप्पणी न्यायमूर्ती भुयान यांनी केली. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी १३ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

## लातूर येथे हज यात्रेकरूंसाठी एकदिवसीय प्रशिक्षण शिबिर

**लातूर/प्रतिनिधी :** हज यात्रेवर जाणाऱ्या भाविक यात्रेकरूंसाठी योग्य मार्गदर्शन व तयारी व्हावी, या उद्देशाने बदर वेल्फेअर फाउंडेशन, लातूर यांच्या वतीने एकदिवसीय हज प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर सोमवार, दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजल्यापासून असर नमाजेपर्यंत आयोजित करण्यात येणार आहे.

शिबिराचे ठिकाण एम. के. फंक्शन हॉल, ६० फूट रोड, लातूर असे आहे.

या प्रशिक्षण शिबिरात हज व उमराच्या विधी, एहराम, तवाफ, सई, वकूफ, तसेच मदीना मुनव्वराची जियारत याबाबत सविस्तर व सोप्या शब्दांत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या शिबिरासाठी हजरत मौलाना मुफ्ती आरिफ साहेब (बीड) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच हज कमिटी ऑफ इंडिया, मुंबई यांच्या मान्यताप्राप्त शासकीय हज प्रशिक्षकांकडून देखील मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

हज यात्रेकरूंना आवश्यक असलेले फॉर्म्स शिबिरस्थळी उपलब्ध करून दिले जाणार असून, महिलांसाठी पडद्याची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

संपर्कासाठी : अलहाज शुजाउद्दीन साहेब : ९७६४०४९४४१

अलहाज मुजम्मिल साहेब : ८०५५५५४४४७

हज यात्रेकरूंनी या प्रशिक्षण शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन बदर वेल्फेअर फाउंडेशन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## दुचाकीची चोरी; गुन्हा दाखल

**लातूर/प्रतिनिधी :** विवेकानंद चौक पोलिस ठाण्याच्या हद्दीतून दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असून, नुकतीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसरातून एक मोटारसायकल चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी नामदेव श्रीरंग घोडके (रा. गरसुळी, ता. रेणापूर) यांची हीरो स्प्लेंडर (क्र. एमएच २२ एबी ६२९५) ही दुचाकी २८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८:३० ते दुपारी १:३० च्या दरम्यान मेडिकल कॉलेज परिसरातून अज्ञात चोरट्याने लंपास केली. या चोरीला गेलेल्या दुचाकीची किंमत सुमारे २०,००० रुपये आहे. याप्रकरणी ४ फेब्रुवारी रोजी विवेकानंद चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. तपास पोलिस हवालदार यादव करत आहेत.

## आरआयटीची मॅथेमॅटिक्स ट्रेनिंग यशस्वी केल्याबद्दल विद्यार्थिनींचा सत्कार

**अहमदपूर/प्रतिनिधी :** मॅथेमॅटिक्स टॅलेंट ट्रेनिंग सर्च (MTTS) हैदराबाद, तेलंगणा व कर्नाटक राज्यातील धारवाड येथील आय.आय.टी. आयोजित धारवाड येथे नुकत्याच पार पडलेल्या INITI-TION INTO M-THEM-TICS ही मॅथेमॅटिक्स ट्रेनिंग या ट्रेनिंगसाठी येथील महात्मा गांधी महाविद्यालयातील बी. एस्सी. द्वितीय वर्षामध्ये शिकत असलेल्या कुमारी श्रद्धा शिवाजी कदम व कुमारी नम्रता सचिन भांडे या विद्यार्थिनींची निवड झालेली होती. या दोन्ही विद्यार्थिनींनी सदरील ट्रेनिंगमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल महाविद्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अँड किशनराव बेंडकुळे, सचिव अँड पी. डी. कदम आणि विचार विकास मंडळाचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार, गणित विभाग प्रमुख प्रा. बी. यु. मंगरूळकर, प्रा. कदम आकांक्षा, स्टाफ सेक्रेटरी डॉ. ए. पी कांबळे, डॉ. यादव सूर्यवंशी इतर शिक्षक,



शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालय परिवाराने विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## दयानंद मध्ये इन्क्वीटी टेक्नॉलॉजिज सेंटर ऑफ एक्सलेन्स ची स्थापना



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्थेचा नुकताच इन्क्वीटी टेक्नॉलॉजिज (इन्क्यूब फार्मा, पुणे) या नामांकित कंपनीशी सामंजस्य करार (एम.ओ.यू ) करण्यात आला. पुणे येथिल इन्क्वीटी टेक्नॉलॉजिज ( इन्क्यूब फार्मा प्रायव्हेट लिमिटेड) या कंपनी बरोबर करार झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या औद्योगिक प्रशिक्षण, संशोधन, मेडिकल कोडिंग, फार्माकोव्हिजिलन्स, रेग्युलेटरी अफेअर्स हे कोर्सेस आहेत. या माध्यमातून करिअर गाईडन्स व भविष्यातील नोकरी संधींसाठी हे करार उपयुक्त ठरणार आहेत. इन्क्यूब फार्मा प्रायव्हेट लिमिटेड कंपनी महाविद्यालयांशी सहकार्य करून प्रशिक्षण उपक्रम सुरू करण्यासाठी सीएसआरसाठी निधीचा वापर करते.

या प्रयोगशाळे अंतर्गत सॉफ्टवेअर आणि आरोग्यसेवा आणि जीवन विज्ञान (LS) क्षेत्रात उत्कृष्टता केंद्र (COE) ची स्थापना, जे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) उपायांसह एकत्रित केले जाईल. तसेच कंपनी विद्यार्थ्यांसाठी प्रायोजित प्रकल्प, रिअल टाइम केस स्टडीज आणि समस्या विधान आणण्याची योजना आखत आहे. कंपनी प्रथम वर्षापासून अंतिम वर्षापर्यंतच्या सर्व शाखांसह विद्यार्थ्यांसाठी प्रमाणन अभ्यासक्रम, अँड-ऑन कार्यक्रम, प्रशिक्षण आणि इंटर्नशिप संधी डिझाइन करते, ते महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांची कौशल्ये आणि उद्योग संरेखन मजबूत करण्यासाठी फॅक्लटी डेव्हलपमेंट प्रोग्राम (FDPs) देखील देते.

इन्क्वीटी टेक्नॉलॉजिज कडून प्रतिनिधी शार्दूल भोसले ( हेड सी.एस.आर अँड कॉलेज कोलॅबरेशन) आणि आतिष जाधव ( हेड ऑफ प्लेसमेंट अँड कॉर्पोरेट कोलॅबरेशन ) उपस्थित होते.

दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक आणि विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड आणि शिक्षण संस्थेचे ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी प्रा. अनिल बिरादार यांनी या करारासाठी पुढाकार घेतला.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, सहसचिव विशाल लाहोटी, सहाय्यक सचिव अजींक्य सोनवणे, कोषाध्यक्ष संजय बोरा तसेच सर्व विभागप्रमुख व प्राध्यापकवृंद यांनी या करारासाठी अभिनंदन केले.



माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख व सौ. सुवर्णाताई दिलीपराव देशमुख यांनी जि. परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी बाभळगाव येथे सपत्नीक मतदानाचा हक्क बजावला



भाजपा नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर या आपल्या गावी कुटुंबीयासमवेत मतदान केले.



आमदार अभिमन्यू पवार यांच्यासह सहकाऱ्यांनी मतदान केले.



लातूर शहराचे आमदार अमित देशमुख यांच्यासह सहकाऱ्यांनी मतदान केले.



लातूर जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब ,विलास साखर कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख, सौ सुवर्णाताई दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामीणचे माजी आमदार धीरज विलासराव देशमुख सौ दीपशिखा धीरज देशमुख यांनी बाभळगाव येथे कुटुंबासह मतदान करून लोकशाहीच्या उत्सवात सहभाग नोंदवला आहे.

## शिक्षण व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी साधन : अॅड.पाठक

**लातूर:** विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना केवळ गुण मिळविण्यापुरते मर्यादित न राहता शिक्षणाचा खरा हेतू समजून घेतला पाहिजे. शिक्षण हे व्यक्तीमत्व विकासाचे प्रभावी साधन आहे. योग्य संस्कार, जीवनमूल्ये, सकारात्मक दृष्टीकोन यांच्या आधारेच उज्ज्वल भविष्य घडते. प्रत्येक विद्यार्थी हा स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार आहे, असा विश्र्वास आनंद मानसिक व अध्यात्मिक सल्ला केंद्राचे संचालक अॅड. नंदकिशोर पाठक यांनी व्यक्त केला.

लातूरच्या दत्तनगरातील श्री सदानंद माध्यमिक विद्यालयात आयोजित अधिव्याख्यानात ते प्रमुख व्याख्याते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा. डॉ. आर. के कुलकर्णी होते. यावेळी मुख्याध्यापक सतीश हलगरकर, पर्यवेक्षक खुंटेगावे, ज्येष्ठ शिक्षक पांचाळ यांच्यासह शिक्षकवृंदांची प्रमुख उपस्थिती होती. अॅड. पाठक पुढे म्हणाले, सद्गुरू वामनराव पै यांनी दिलेली जीवनमूल्ये, तत्त्वज्ञान व संस्कार विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवतात. राष्ट्रप्रेम, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, चांगली संगत, व्यसनांपासून दूर राहणे, शारीरिक-मानसिक आरोग्याचे जतन आणि निसर्गनियमांचे पालन या गुणांचा अंगीकार केल्यास जीवन यशस्वी व समृद्ध होते, असे ते म्हणाले.


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# हा प्रकार तर योग्य नाही

अधिवेशन म्हटले की गोंधळ हा आलाच, तो यापुढे होणार नाही या बाबत याची खात्री देणे आवघड झाले आहे. त्यामुळे संसद सदस्यांनीच या बाबत विचार करण्याची मोठी गरज निर्माण झाली आहे. लोकसभा ही लोकशाहीचे सर्वश्रेष्ठ सभागृह आहे त्यात देशाचे प्रथम नागरिक म्हणजे पंतप्रधान यांच्यावर हल्ला सारखा काही प्रकार होणार असेल तर अतिषय लाजीरवाणी बाब आहे. यावेळी असे समजलेले असे की, लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भाषणावेळी काही काँग्रेस खासदार अनुचित प्रकार करण्याची शक्यता असल्याची माहिती मिळाली होती. त्यामुळे लोकसभापती यांनी मोदींना सभागृहात येऊ नका असा सल्ला दिला, असे स्पष्टीकरण गुरुवारी लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी सभागृहात दिले. बिर्ला यांनी सभागृहात हे निवेदन देऊन काँग्रेसच्या खासदारांकडून मोदींच्या जिवाला धोका निर्माण झाला असता, असे अप्रत्यक्षपणे सूचित केले. लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला मोदी बुधवारी उत्तर देणार होते मात्र, लोकसभेत आक्रमक झालेल्या विरोधी पक्ष सदस्यांमुळे पंतप्रधान मोदी सभागृहात आले नाहीत. मोदी संसदेत असून ते सभागृहात आले नाहीत. सत्ताधारी बाजूच्या मोदींच्या आसनाला काँग्रेसच्या महिला खासदारांनी घेराव घातला होता. सभागृह तहकूब झाल्यानंतरही या महिला खासदार तिथून बाजूला होण्यास तयार नव्हत्या. त्यांचा हेतू मोदींचे भाषण सुरू असताना अडथळे आणण्याचा होता असा आरोप भाजपने केला. हा मुद्दा लोकसभाध्यक्ष बिर्ला यांनी गुरुवारी लोकसभेत मांडला. 'जेव्हा पंतप्रधान सभागृहात राष्ट्रपतींच्या अभिभाषणाला उत्तर देणार होते, तेव्हा मला माहिती मिळाली होती की, काही काँग्रेस खासदार पंतप्रधानांच्या खुर्चीजवळ एखादी अनुचित घटना घडवू शकतात. जर अशी घटना घडली असती, तर देशाच्या लोकशाही परंपरेच्या चिंधड्या उडाल्या असत्या. हे टाळण्यासाठी, मी पंतप्रधानांना सभागृहात न येण्याची विनंती केली, असे बिर्ला म्हणाले. काही खासदारांनी लोकसभा सभागृहात गैरवर्तन केले होते, काँग्रेसच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षाचे खासदार पंतप्रधानांच्या भाषणादरम्यान गोंधळ घालण्याचा प्रयत्न करू शकतात, अशी पूर्वमाहिती मिळाली होती. हे जर सत्य असेल तर अतिषश दुर्दैवी बाब आहे. लोकसभेत जे कामकाज चालते ते देशातील जनता पाहाते. सर्व काही खेळीमेळीने चालत असेल तर संघर्ष काही कामाचा नाही. संघर्ष दरवेळी होताना दिसून येत आहे. काँग्रेस वरचेवर आक्रमक होताना दिसून येत आहे. खासदार राहुल गांधी व प्रियंका गांधी हे वाटेल ते बोलताना दिसून येत आहेत. जसे लोकसभेत आक्रमण होतात तसे जनतेच्या कामा बाबत बोलले पाहिजे तरच अनेक राज्य त्यांच्या हातून सुटले नसते. देशात काँग्रेसची स्थिती काय सांगते. देशात अनेक राज्य काँग्रेसच्या हातून गेले आहेत. त्यामुळे काँग्रेसने ग्रामपातळीवर काम करण्याची गरज आहे. सत्तेवर अंकुश विरोधकांचा असला पाहिजे. यात दुमत नाही. आक्रमकता ही जनतेला आवडली पाहिजे. एकतर्फी पंतप्रधानांस टार्गेट होत असेल तर ती बाब जनतेला सहज कळते. देशात अनेक प्रश्न आहेत. त्याकडे विरोधकांचे दुर्लक्ष होताना दिसून येत आहे. केवळ पंतप्रधानावर टिका होत आहे. नको ते बोलताना दिसून येत आहे. विरोधकांच्या टिकेला जनतेचा सहभाग किती आहे याचा विचार विरोधकांनी केला पाहिजे. जनतेचा पाठींबा मिळत नाही. जे बोलत आहेत ते एकून सोडून दिले जात आहे. वास्तविक विरोधकांनी एखादे आंदोलन केले त्याला देशातील नागरिकांनी मोठा पाठींबा दिला असे होताना दिसून येत नाही. केवळ पंतप्रधान यांना टार्गेट का केले जाते? देशांतर्गत व बाह्य प्रश्न आहेत. त्यावर चर्चा होणे अपेक्षित होते. आज अमेरिकेचे व्यापारी धोरणावर चर्चा अपेक्षित होती. केंद्राचा अर्थसंकल्प मांडला यावर चर्चा होणे अपेक्षित होते. जे पुस्तक अजून प्रकाशित झाले नाही. अशा पुस्तकातील बाबीवर चर्चा होत असेल तर ते योग्य नाही. या पुस्तकातील मजकुराबाबत जनतेच्या मनात काय आहे. जनता किती पेटून उठली असती, मुळात आपला देश मोठा आहे. अनेक समस्या निर्माण होतात. त्यात शेजारील राष्ट्र गप्प बसत नाहीत. सतत देशविरोधी कारवाया करीत असतात. चीन व पाकिस्तान हा तर भारताचा मित्र नाही तर कट्टर विरोधक आहे. त्यात बांगला देशाची भर पडली आहे. या तीन देशाला न जुमनता देश प्रगती साधत आहे. लोकशाही आहे याचा अर्थ काही ही मत व्यक्त करणे योग्य नाही. लोकशाहीत जनतेच्या आवाजाला महत्त्व असते, ते दिसून येत नाही तर विरोधकच आवाज चढवुन वागताना दिसून येत आहेत. केवळ पंतप्रधानावर सर्व टार्गेट केले जात आहे हे आज पर्यंतच्या विरोधकांच्या चालीवरून दिसून येत आहे. लोकसभेचे सभापती जर पंतप्रधानांना भाषणादरम्यान धोका असल्याचे मत व्यक्त केले आहे. यावरून जनतेनी आता विचार केला पाहिजे की, अशी घटना किती भयानक आहेत. वास्तविक प्रश्न हे विचाराने व वैचारिक पद्धतीने सोडविली पाहिजे. सत्ताधारी बाहेर जे वक्तव्य करीत असतात त्या बदल्यात संसदेत आवाज उठविला पाहिजे. आज विरोधकांची स्थिती समाधानाची नाही कारण अनेक राज्य त्यांच्या हातून सुटलेले आहेत. भाजपाकडे वळले आहेत. त्यामुळे पहिल्यांदा जनतेत विरोधकांनी लोकप्रियता मिळविण्याचा प्रयत्न करावा. कार्यकर्त्यांशी सतत संवाद साधावा. कार्यकर्त्याशी थेट संबंध आला पाहिजे. कार्यकर्ताच खरा पक्षाचा आत्मा समजला जातो. आज विखुरलेला कार्यकर्ता आहे. राहुल गांधी भेटत नाहीत अशी ओरड आहे. पहिल्यादा काँग्रेसची स्थिती सुधारण्याकडे लक्ष दिले पाहिजे. नंतर इतरावर टिका करणे योग्य ठरणारे आहे. त्यामुळे लोकसभापती यांची जे पंतप्रधानाबाबत विचार व्यक्त केले ते सतजल्याने अतिषय क्लेश दायक आहेत. मनाला न पटणारे आहेत. पंतप्रधानवर संसदेमध्ये संकट येणार असेल तर तसा कट असेल तर ते योग्य नाही. समस्या असू शकतात त्या सोडविल्या पाहिजेत. एक व्यक्ती जर जमू देत नसेल तर त्याला बदनाम करण्याचा कट असेल तर ते योग्य नाही. मुळात हे जनतेला पटणारे नाही. जनतेला आवडणारे नाही. उलट काँग्रेसची प्रतिमा डागळण्याची शक्यता आहे. त्यामुळे काँग्रेसने काही निर्णय घेण्याअगोदर कार्यकर्त्याशी, विचारवंताशी चर्चा करणे अपेक्षित आहे. लोकशाहीत जसे सत्ताधाऱ्याना महत्त्व आहे तरी अधिक पटीने विरोधकांना आहे हे विरोधकांनी लक्षात ठेवले पाहिजे. पंतप्रधानाबाबत लोकसभापती यांनी माहिती सांगितली ती अतिषश क्लेश दायक आहे.

# रमाबाई आंबेडकरांचे सामाजिक परिवर्तनाच्या पायाभरणीतील योगदान



७ फेब्रुवारी हा दिवस भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत अर्थपूर्ण, संवेदनशील आणि प्रेरणादायी ठरतो. हा दिवस म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनसाथी, त्यागमूर्ती, संघर्षशील आणि मौनात राहूनही सामाजिक क्रांतीची मशाल पेटती ठेवणाऱ्या रमाबाई भिमराव आंबेडकर यांचा जयंती दिन होय. भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय विषमता, सामाजिक अन्याय, स्त्रीदमन, आर्थिक दारिद्र्य आणि मानसिक गुलामगिरीच्या पार्श्वभूमीवर रमाबाईंचे जीवन केवळ एका महापुरुषाच्या पत्नीचे जीवन नव्हते. ते जीवन एका स्वतंत्र सामाजिक योद्ध्याचे, अपार सहनशीलतेचे, निःस्वार्थ त्यागाचे आणि मौनातून घडलेल्या क्रांतीचे जिवंत प्रतीक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक, शैक्षणिक आणि राजकीय संघर्षामागे रमाबाईंच्या कष्टांची, वेदनांची आणि शांत पाठबळाची भक्कम भिंत उभी होती, हे वास्तव समजून घेतल्याशिवाय आंबेडकरी चळवळीचे संपूर्ण चित्र स्पष्ट होत नाही.

रमाबाई आंबेडकर यांचा जन्म अत्यंत साध्या, उपेक्षित आणि सामाजिकदृष्ट्या वंचित परिस्थितीत झाला. त्या काळातील दलित समाजाचे जीवन म्हणजे अपमान, अस्पृश्यता, दारिद्र्य, बहिष्कार आणि सततची असुरक्षितता यांचा संगम होता. स्त्री म्हणून जन्माला येणे म्हणजे दुहेरी अन्याय सहन करणे, हीच त्या समाजाची वास्तवता होती. शिक्षण, स्वातंत्र्य, निर्णयक्षमता, आरोग्य आणि आत्मसन्मान या मूलभूत हक्कांपासून स्त्रीला वंचित ठेवणारी सामाजिक रचना रमाबाईंच्या आयुष्यावरही खोलवर परिणाम करत होती. बालपणापासूनच कष्ट, काम, जबाबदाऱ्या आणि मौनातील सहनशीलता हेच त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग बनले. लहान वयातच जीवनातील कठोर वास्तव स्वीकारावे लागल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व संयमी, सहनशील आणि आत्मसंयमी बनले.

अत्यंत लहान वयात रमाबाईंचा विवाह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झाला. हा विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील कौटुंबिक नाते नव्हते, तर तो एका व्यापक सामाजिक संघर्षाचा प्रारंभ होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आयुष्य शिक्षण, विचार, आंदोलन, संघर्ष आणि सामाजिक विरोधाने भरलेले होते. या संघर्षांचा भार रमाबाईंनाही समानतेने पेलावा लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणासाठी, नोकरीसाठी आणि समाजसुधारणेसाठी सातत्याने व्यग्र असताना रमाबाई घर, कुटुंब, मुले आणि सामाजिक वास्तव यांचा समतोल राखत होत्या. संसार सांभाळताना त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ध्येयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले नाही, उलट त्या ध्येयांवर त्यांनी अढळ विश्वास ठेवला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षण भारताबाहेर सुरू असताना रमाबाईंवर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी येऊन पडली. आर्थिक टंचाई, अन्न-वस्त्राचा अभाव, आजारपण, सामाजिक उपेक्षा आणि मानसिक ताण हे त्यांचे रोजचे वास्तव होते. अनेक वेळा उपाशीपोटी दिवस काढावे लागले, साध्या वस्त्रांवर समाधान मानावे लागले. तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, हीच त्यांची ठाम भूमिका होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचनी मिळवलेले ज्ञान हे केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नसून संपूर्ण समाजाच्या मुक्तीसाठी आहे, याची रमाबाईंना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या वेदनांवर मौन धारण करून सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाला बळ दिले.

रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील सर्वांत वेदनादायी आणि हृदयद्रावक अध्याय म्हणजे त्यांच्या मुलांचे अकाली निधन होय. मातृत्वाचा आनंद अनुभवण्याआधीच त्यांना असह्य दुःख सहन करावे लागले. एका मागोमाग एक अपत्य गमावणे ही कोणत्याही आईसाठी अकल्पनीय वेदना असते. रमाबाईंच्या आयुष्यात ही वेदना वारंवार आली. तरीही त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर त्याचा परिणाम होऊ दिला नाही. स्वतःच्या दुःखाला बाजूला ठेवून समाजासाठी झटणाऱ्या पतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, हेच त्यांनी आपले जीवनधर्म मानले. रमाबाईंचा हा त्याग भारतीय स्त्रीच्या सहनशीलतेचा, मानसिक बळाचा आणि निस्वार्थ प्रेमाचा सर्वोच्च नमुना आहे.

रमाबाई आंबेडकर या जरी प्रत्यक्ष सामाजिक आंदोलनांच्या मंचावर दिसत नसल्या, तरी त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे, मूलभूत आणि निर्णायक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना स्थैर्य देणारे, त्यांच्या संघर्षाला मानसिक आधार देणारे आणि त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कठीण काळात खंबीरपणे साथ देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे रमाबाई आंबेडकर होत्या. अस्पृश्यता निवारण, शिक्षणाचा प्रसार, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, धर्मांतर चळवळ आणि भारतीय संविधाननिर्मिती यांसारख्या ऐतिहासिक कार्यांसाठी बाबासाहेबांना जे मानसिक बळ आवश्यक होते, ते रमाबाईंच्या निस्वार्थ त्यागातून मिळाले.

रमाबाईंचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे, शांत, संयमी आणि आत्मसन्मानाने भरलेले होते. प्रसिद्धी, सन्मान, मान्यता किंवा सार्वजनिक गौरवाची अपेक्षा त्यांनी कधीच ठेवली नाही. समाजाने अनेकदा त्यांच्याकडे केवळ 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्नी' म्हणून पाहिले, परंतु प्रत्यक्षात त्या एका स्वतंत्र विचारसरणीच्या, मूल्यनिष्ठ आणि आत्मसन्मान जपणाऱ्या स्त्री होत्या. अपमान, दुर्लक्ष, अवहेलना आणि कष्ट सहन करूनही त्यांनी कधी तक्रार केली नाही. त्यांचे मौन हे कमजोरीचे नव्हे, तर अंतर्गत शक्तीचे, संयमाचे आणि आत्मविश्वासाचे प्रतीक होते.

भारतीय समाजातील स्त्री-पुरुष समानतेच्या चर्चेत रमाबाई आंबेडकर यांचे जीवन अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यांनी स्त्रीवादावर भाषणे केली नाहीत, लेखन केले नाही, परंतु त्यांच्या जीवनाने स्त्रीच्या सामाजिक भूमिकेची नवी व्याख्या केली. शिक्षणापासून वंचित असूनही त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक ध्येयांना त्यांनी पूर्ण पाठिंबा दिला. त्यांच्या जीवनातून हे स्पष्ट होते की स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून ती सामाजिक परिवर्तनाची शांत पण प्रभावी वाहक असते.

रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील दारिद्र्य हे केवळ आर्थिक नव्हते, तर ते सामाजिक अन्यायाचे आणि संरचनात्मक विषमतेचे प्रतीक होते. जातीय भेदभाव, सामाजिक बहिष्कार, धार्मिक रूढी आणि स्त्री म्हणून दुय्यम स्थान या सगळ्यांचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर झाला. तरीही त्यांनी परिस्थितीला दोष देत बसण्याऐवजी आशेचा मार्ग स्वीकारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर, मूल्यांवर आणि ध्येयांवर ठेवलेला विश्वास हेच त्यांच्या जगण्याचे बळ होते. त्यांच्या जीवनातून हे अधोरेखित होते की सामाजिक परिवर्तनासाठी फक्त पुढे उभे राहणारे नेतेच नव्हे, तर मागे उभे राहून आधार देणारे व्यक्तिमत्त्वही तितकेच महत्त्वाचे असते.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन स्त्रीवादाचा अप्रत्यक्ष पण प्रभावी आधारस्तंभ आहे. त्यांनी शब्दांतून स्त्रीवाद मांडला नाही, परंतु त्यांच्या जीवनप्रवासाने स्त्रीच्या दुहेरी संघर्षाचे वास्तव जगासमोर ठेवले. जातीय अन्याय आणि पितृसत्ताक व्यवस्था या दोन्हींचा सामना करत त्यांनी आपले जीवन जगले. आजच्या स्त्री-अभ्यासात रमाबाईंच्या जीवनाकडे केवळ सहनशीलतेचे प्रतीक म्हणून नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत मोलाचे योगदान देणाऱ्या स्त्री म्हणून पाहिले जाणे आवश्यक आहे.

आजच्या काळात रमाबाई आंबेडकर यांचे स्मरण केवळ औपचारिक जयंतीपुरते मर्यादित राहू नये. त्यांच्या जीवनाचा अभ्यास करताना स्त्री-संघर्ष, दलित प्रश्न, कुटुंबातील त्याग, मानसिक सहनशीलता, भावनिक श्रम आणि सामाजिक परिवर्तनातील अदृश्य योगदान या सर्व पैलूंवर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. रमाबाईंच्या जीवनकथेचा समावेश शिक्षणक्रमात, सामाजिक चर्चेत, स्त्री-अभ्यासात आणि दलित साहित्याच्या अभ्यासात होणे ही काळाची गरज आहे.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन हे भारतीय समाजाच्या वास्तवाचे आरसेपण आहे. त्या समाजाच्या कडेला उभ्या राहिलेल्या, पण परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असलेल्या स्त्रीचे प्रतीक आहेत. त्यांनी कधीही स्वतःसाठी इतिहास लिहिला नाही, परंतु त्यांच्या त्यागाने इतिहास घडविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्यामागील अदृश्य शक्ती म्हणून रमाबाईंचे स्थान अढळ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना त्यांच्या मूल्यांना आत्मसात करणे, हेच त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य ठरेल.

रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ अभिवादन न करता त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आजच्या सामाजिक प्रश्नांकडे नव्या दृष्टीने पाहिले पाहिजे. स्त्री सक्षमीकरण, सामाजिक न्याय, मानवी मूल्यांची जोपासना, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या अंमलबजावणीसाठी रमाबाईंचे जीवन मार्गदर्शक ठरते. त्यांचे मौन आजही आपल्याशी बोलते, त्यांचा त्याग आजही समाजाला प्रश्न विचारतो आणि त्यांचे जीवन आजही परिवर्तनाची प्रेरणा देते. म्हणूनच रमाबाई भिमराव आंबेडकर या केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नाहीत, तर त्या वर्तमान आणि भविष्याला दिशा देणाऱ्या विचारांची अखंड साक्ष आहेत.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# संत नरहरी सोनार! वारकरी संप्रदायातील पहिले शैववंशी

सोनार समाजाचे महाराष्ट्रातील प्रमुख श्रद्धास्थान असणाऱ्या संत नरहरी महाराजांचे प्रत्यक्ष समाधी मंदिर असणारे पंढरपूरचे नरहरी मंदिर समितीतर्फे सालाबाद प्रमाणेच पुण्यतिथी सप्ताह उत्सव साजरा होत असून सप्ताहातील आजचा दिवस सर्वात मुख्य पुण्यतिथी दिवस जो की 'हरीऐक्य दिवस' म्हणून ही मोठ्या भक्ती भावाने साजरा होत आहे. वारकरी संप्रदायातील थोर ज्येष्ठ वैष्णव संत म्हणजे संत नरहरी. ज्यांनी लग्न झाल्यानंतर वयाच्या विसाव्या वर्षी शैव दीक्षा घेतली पण एकदा शिव आणि विठ्ठल एकच असल्याचा साक्षात्कार झाल्याने त्यांनी आपला जीवन मार्ग विठ्ठलमय करून टाकला, व वयाच्या २६ व्या वर्षी पुन्हा वैष्णव झाले. त्यांचे संपूर्ण कुळ वैष्णव होते. काही लोक त्यांना आजही कट्टर शैव म्हणतात पण त्यांच्या अख्ख्या कुळात जेवढे व्यक्ती झाले त्या सर्वांचे नावे ही विष्णूंचीच आहेत. वडील अच्युत, आजोबा मुरारी, पणजोबा मुकुंद, व खुद्द महाराजांचे मुलाचे नाव ही नारायणाच होते. यात एकाचेही नाव शिवाचे नाही. पण चार-पाच वर्षाचा काळ हा कट्टर शिव उपासनेत घातला कारण लग्नानंतर पुत्र संतती होत नाही म्हणून विठ्ठलाचे तोंडही पाहणार नाही हा ठाम निश्चय केलेला होता. परंतु तरीही विठ्ठल साक्षात्कारा ने त्यांचेतील अज्ञान नष्ट झाले व पुढे मुलाचे नाव नारायण ठेवले. संत नरहरी महाराजांचा जन्म श्रावण शुक्ल १३ ला, इसवी सन ११९३ शके १११५ च्या आसपास पंढरपूर येथे झाला. तसे ते मूळचे सांगली जिल्ह्यातील मिरज संस्थानातील म्हेत्रे गावचे असल्याचे म्हटले जाते. आडनाव महामुनी मूळ म्हेत्रे वतन।, मिरासी दुकान महाद्वारी।।. हे संत नामदेव महाराजांच्या अभंगातील वाक्य आहे. नरहरींच्या पत्नीचे नाव गंगा, मंगळवेढा तालुक्यातील ब्रह्मपुरी गावच्या श्रीपती वेदपाठक (पोतदार) यांची मुलगी. तर मुलांची नावे नारायण आणि मल्लिनाथ अशी होती. पूर्वी सोनार समाजात पोट शाखा नव्हत्या, (म्हणजे पांचाळ, लाड, दैवज्ञ, अहिर इत्यादी. ) पण नंतरच्या काळात विविध पोटशाखा निर्माण झाल्या ,त्याआधी संपूर्ण समाज 'विश्वकर्मा ब्राह्मण समाज' म्हणूनच ओळखला जात होता. तसेच महाराज हे वयोवृद्ध संत असल्याने संतजनही त्यावेळी त्यांना 'महामुनी' म्हणत असे, त्यामुळे महाराज महामुनी सोनार म्हणून ही ओळखले जायचे. संत नामदेव, संत चांगदेव व मालू कवींनी आपल्या आरती आणि अभंगात याचा उल्लेख केलेला आढळतो. अशा सोनार समाजातील सर्वश्रेष्ठ समाजपुरुषावर विविध चित्रपट , धार्मिक पुस्तके, अभंग, साहित्यिक रचना इत्यादी प्रसिद्ध आहेत. चित्रपटांमध्ये कटिबंध सन २०१९, संत नरहरी सोनार सन २०१५, तसेच नरहरी हा चित्रपट २०१६ ला निघून प्रदर्शित झाला. त्यांचेवर वेगवेगळी धार्मिक पुस्तके ही लिहिली गेली. त्यांचेवर पहिले पुस्तक हे बाळकृष्ण शास्त्री क्षीरसागर यांचे' संत नरहरी सोनार'हे सण १९०१ मध्ये लिहिले गेले. तदनंतर कराडचे पालकर यांचे कडून संत नरहरी सोनार महाराजांची चरित्र तसेच अशीच विविध लेखकांकडून सात-आठ पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. अशा महान संतश्रेष्ठ नरहरी महाराजांची कीर्ती राज्यभर, देशभर तसेच देशाबाहेरही पसरलेली आहे. संपूर्ण भारतभर व विदेशातही सर्व संप्रदायात माघ कृष्ण तृतीयेला पुण्यतिथी ही 'हरीऐक्य दिन' म्हणूनही साजरा केला जात असतो. तोच हा आजचा दिवस होय. संत नरहरी महाराजांच्या नावे जवळजवळ ६३ अभंग उपलब्ध आहेत, पैकी सवंगडे निवृत्ती, सोपान, मुक्ताई तसेच शिव आणि विष्णू एकची प्रतिमा आणि माझे प्रेम तुझे पायी व देवा तुझा मी सोनार हे अभंग विशेषत्वाने प्रसिद्ध व लोकप्रिय झालेली आहेत. संत नरहरी महाराजांना या आजच्या पावन पवित्र दिवशी राज्यव्यापी महाराष्ट्र सुवर्णपरिवर तर्फे कोटी कोटी विनम्र अभिवादन!व दंडवत प्रणाम! जय नरहरी!!

**-रत्नाकर वेदपाठक,**
**(प्रवर्तक, महाराष्ट्र सुवर्णपरिवार.)**

# घरातच लावा गुणकारी हळद, जाणून घ्या 'या' सोप्या गार्डनिंग टिप्स

प्रत्येक भारतीय स्वयंपाकघरात हळद आवर्जून पाहायला मिळते. आपण लहानपणापासून हळदीचे फायदे पाहात आलो आहोत. हळदी हा फक्त एक साधा मसाला नाही तर आयुर्वेदात त्याला एक शक्तिशाली औषध देखील मानलं जातं. तुम्ही बाजारातून हळद खरेदी करू शकता, परंतु कधीकधी तुम्हाला भेसळयुक्त हळद खरेदी करावी लागते. त्यामुळेच अलीकडे काही लोक घरीच ती लावणे पसंत करत आहेत.

अनेकांना माहिती नसेल पण हळदीचे रोप घरी लावणे आणि ते वाढवणे खूप सोपे आहे. हळदीचे रोप वाढवण्यासाठी ना मोठी जागा लागते ना जास्त काळजी घ्यावी लागते. आज, आपण काही सोप्या टिप्स पाहूया जे फॉलो करून काही महिन्यांत तुम्ही घरीच उगवलेली ताजी हळद वापरू शकाल..

**हळद निवडण्याची पद्धत-**

घरी हळदीचे रोप लावायचे असेल तर, तुम्हाला त्याचे कंद आणावे लागेल.यासाठी मार्केटमध्ये जाऊन सर्वात ताजी, जाड हळद निवडा. खरेदी करताना, कोंबांना लहान, ठळक टोके आहेत याची खात्री करा. हे कंद खूप चांगले वाढतात.

**कोणत्या आकाराची कुंडी घ्यावी-**

जर तुमच्याकडे मर्यादित जागा किंवा बाग असेल, तर तुम्ही कुंडीतदेखील हळदीचे रोपे लावू शकता. हळदीचे रोप लावण्यासाठी १२ ते १४ इंचाची कुंडी निवडा आणि त्यात पाण्याचा निचरा करण्यासाठी होलसुद्धा असल्याचं पाहून घ्या.

**माती कशी असावी-**

जर तुम्ही हळदीची लागवड करत असाल तर तुम्हाला हलकी, बारीक केलेली आणि पोषक तत्वांनी समृद्ध मातीची आवश्यकता आहे. यासाठी बागेची माती, कंपोस्ट आणि वाळू समान प्रमाणात मिसळून मिश्रण तयार करा. हळद या प्रकारच्या मातीत वेगाने वाढते आणि पाण्याचा सहज निचरा होण्यास मदत होते.

**हळदीची लागवड करण्याची पद्धत-**

माती योग्यरित्या मिक्स केल्यानंतर, कुंडीत हळदीचे कंद घाला आणि ते दोन ते तीन इंच खोल खोचून टाका. नंतर वरून मातीने झाकून टाका आणि वर थोडे पाणी शिंपडा. कंद लावताना, ते उलटे लावू नका कारण कोंब वरच्या दिशेने राहील याची काळजी घ्या.

# पोटात सतत आग आणि जळजळ होतेय? 'या' टिप्स फॉलो केल्यास मिळेल आराम

अनेक लोक पोटात जळजळ आणि आग होण्याच्या समस्येने त्रस्त असतात. ज्याचा मानसिक आरोग्यावरही वाईट परिणाम होतो. खरं तर, आजच्या धावपळीच्या जीवनात आणि इतरांपेक्षा सरस ठरण्याच्या धावपळीत लोकांनी त्यांची जीवनशैली बिघडवली आहे. रात्री उशिरापर्यंत जागणे सकाळी उशिरा उठणे अशा दिनचर्येने पचनावर वाईट परिणाम होतो आणि पोटाशी संबंधित समस्या वाढतात.

या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी, तज्ज्ञांनी काही टिप्स दिल्या आहेत.ज्यांचे पालन करून पोटात आग होणे, जळजळ होणे, आम्लपित्त यासारख्या समस्या टाळता येतात. या टिप्स नेमक्या कोणत्या आहेत याबाबत जाणून घेऊया.

**पचायला जड पदार्थ टाळा**

आपल्या आहारात पचण्यास कठीण आणि जास्त प्रोटीन किंवा फॅट्सयुक्त पदार्थांचा समावेश करताना काळजी घ्या. अशा पदार्थांमुळे आम्लपित्त होऊ शकते. रात्री हलके जेवण घ्या आणि रात्रीचे जेवण वेळेवर करा जेणेकरून रात्रीचे जेवण आणि झोपण्याच्या वेळेत दोन तासांचे अंतर असेल.

**जेवल्यानंतर शारीरिक हालचाल-**

आजकाल, लोक कामावरून परतल्यानंतर इतके थकलेले असतात की त्यांना लगेच झोपावेसे वाटते. त्यामुळेच अनेकजण रात्रीच्या जेवणानंतर, लगेच अंथरुणात पडून टीव्ही पाहत झोपी जातात. जर तुम्ही असे करत असाल तर आजच थांबा. कारण जेवणानंतर लगेच झोपायला जाणे किंवा झोपल्याने पचनसंस्थेमध्ये अडथळा येतो आणि पोटाच्या समस्या वाढतात. म्हणूनच जेवणानंतर शतपावली करा.

**भूक असेल तेवढंच खा-**

अनेकफ़ लोक चांगले पदार्थ बघून जास्त खातात. पण हे चुकचं आहे. ज्यामुळे पचनसंस्थेवर नकारात्मक परिणाम होतो आणि पोटाच्या विविध समस्या उद्भवू शकतात. योग्य प्रमाणात खाल्याने आम्लपित्त आणि पोटातील जळजळ कमी होण्यास मदत होते.

# वजन कमी करण्यासाठी खा 'हे' पदार्थ, महिन्यात व्हाल एकदम सडपातळ

आजकाल जंकफूड आणि बैठ्या कामाच्या पद्धतींमुळे वजन वाढण्याची समस्या खूप सामान्य झाली आहे. अनेक लोकांमध्ये पोटाचे प्रमाण वाढते, त्यानंतर त्यांचा आत्मविश्वासही कमी होतो. परंतु व्यस्त जीवनशैलीमुळे, तुम्ही व्यायाम आणि योग्य आहाराकडे लक्ष देऊ शकत नाही आणि याचा तुमच्या आरोग्यावर परिणाम होतो, ज्यामुळे वजन वाढते.

वाढत्या वजनावर नियंत्रण ठेवण्यासाठी व्यायाम आणि निरोगी आहार घेणे खूप महत्वाचे आहे. असे अनेक पदार्थ आहेत जे वजन कमी करण्यास मदत करू शकतात. वजन कमी करण्यास मदत करू शकणाऱ्या या पदार्थांबद्दलआपण जाणून घेऊया

**फळे-**

फळे फायबरने समृद्ध असतात. फळांमध्ये पेक्टिन आणि नैसर्गिक गोड पदार्थांसारखे विरघळणारे तंतू भरपूर असतात. ते पचन सुधारतात आणि गोड पदार्थांची इच्छा कमी करतात. नाशपातीमध्ये विशेषतः पेक्टिन भरपूर प्रमाणात असते, एक प्रकारचा विरघळणारा फायबर जो पचन सुधारतो आणि वजन नियंत्रित करण्यास मदत करतो.वजन कमी करण्यासाठी संत्री, सफरचंद,जांभूळ, कलिंगड,पेरू अशी फळे खावीत.

**हिरव्या पालेभाज्या-**

हिरव्या पालेभाज्या वजन कमी करण्यासाठी देखील फायदेशीर आहेत. पालेभाज्या केवळ मॅग्नेशियम आणि लोहाने समृद्ध नसतात तर फायबरनेदेखील समृद्ध असतात. ते शरीराला डिटॉक्स करण्यास आणि पचन सुधारण्यास मदत करतात.तसेच अतिरिक्त कॅलरीज न देता पोट भरण्यास मदत करतात. ते यकृत विषमुक्त करण्यास आणि हार्मोनल संतुलनास देखील मदत करतात. म्हणून आहारात पालक, मेथी, राजगिरा खाऊ शकता.

**कडधान्ये-**

वजन नियंत्रित करण्यासाठी, तुमच्या आहारात मूग, हरभरे, मसूर अशा कडधान्यांचा समावेश करा. यामध्ये एक विरघळणारे फायबर असते जे खराब कोलेस्ट्रॉल कमी करते आणि भूक नियंत्रित करते. चांगल्या आरोग्यासाठी, रिफाइंड कार्बोहायड्रेट्सऐवजीया कडधान्यांचा समावेश फायदेशीर आहे.

**सीड्स-**

चिया आणि जवस बिया वजन कमी करण्यासाठी देखील फायदेशीर आहेत. कारण ते विरघळणारे फायबर आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिडने समृद्ध आहेत. चिया सीड्स पाणी शोषून घेतात आणि पोटात विस्तारतात, ज्यामुळे तुम्हाला जास्तवेळ पोट भरल्यासारखे वाटते. जवसाच्या बियांमध्ये लिग्नान्स असतात, जे अंतर्गत चरबी कमी करण्यासाठी आणि हार्मोनल आरोग्य सुधारण्यासाठी ओळखले जातात. दररोज एक-एक चमचा सेवन करू शकता.

# ग्रामीण विभाग
## पार हद्दपार

सीराळपभारतात आजही शहरी आणि ग्रामीण अशा दोन वेगवेगळ्या संस्कृती आहेत. ग्रामीण संस्कृतीत गावचा 'पार' म्हणजेच सार्वजनिक ओटा अत्यंत महत्त्वाचा. पार म्हणजे जेथे गावकरी महत्त्वाच्या चर्चेसाठी, निर्णय घेण्यासाठी, रक्षणासाठी किंवा सहजच गप्पा मारण्यासाठी ज्या सार्वजनिक ओट्यावर एकत्र येतात त्याला पार असे म्हणतात. पार हे एक ग्रामीण संकृतीत माध्यम म्हणून महत्वाची भूमिका निभावते.



ग्रामीण भागात लोकजागृती घडवून आणण्यासाठी पार हे माध्यम महत्त्वचे ठिकाण आहे. ग्रामीण भागात गावाच्या केंद्रस्थानी पिंपळाच्या किंवा वडाच्या झाडाखाली गोल स्वरुपात ओटा बांधला जातो. पूर्वी पारावर गावातील महत्वाचे निर्णय घेतले जात. या निर्णय प्रक्रियेत गावाचे पाटील, सरपंच तसेच गावातील सर्व नागरिक सामिल असत. गावातील लोकांचे तंटे सोडविले जात. ग्रामपंचायातही तिचे निर्णय सुनावत असे. पूर्वी पारावरच गावातील शाळाही भरत असे. गावातील विदयार्थी येथे एकत्र येऊन शिक्षण घेत. गावाच्या विकासापासून ते राजकारणापर्यंत सर्व काही चर्चा याच ठिकाणी होत. गावाचा गावगाडा याच ठिकाणाहून चालविला जात असे. ग्रामपंचायतची निर्मिती झाल्यामुळे पारावर ग्रामपंचायत भरणे बंद झाले आहे. मात्र गावचर्चा काही प्रमाणात पारावर होताना आजही दिसते.

पार गावाच्या केंद्रस्थानी असल्यामूळे गावात नवीन पाहुणे आले तर त्यांना गावाची सर्व माहिती येथे बसलेल्या लोकांकडून मिळत असे. याठिकाणी गावातील वृद्ध लोकांपासून ते तरुणांपर्यंत सर्वच मंडळी बसत. आपला वेळ घालवण्यासाठी, गाव-गप्पा करण्यासाठी लोक येथे एकत्र येत. याठिकाणी बसून गावगाड्याविषयी चर्चा करीत. तसेच बाजार-गप्पा येथे करत. गावाचा पारावर एखादा विषय चर्चीला गेला की गावभर तो विषय पोहचत असे. आज माध्यमे जी भूमिका बजावत आहे तशीच भूमिका पूर्वी पार बजावत असे. गावातील लोकांपर्यंत पोहचण्यासाठी पार हे संदेश महत्वाचे माध्यम होते. आजच्या युगात ज्याप्रमाणे फेसबुक, गुगल, ओर्कुट, याहू ही संकेतस्थळे तश्याच प्रकारे पार हे गावातील महत्त्वाचे संदेश वाहक स्थळ होते.

इतिहासाची साक्ष देणारे पार आजही ग्रामीण भागात दिसतात. मात्र बदललेल्या काळानुसार तेही आता ओस पडत आहे. आजच्या नवीन पिढीला पाराची ओळख मराठी चित्रपटातून होते. इंटरनेटच्या जगात फेसबुक, गुगल, ही संकेतस्थळे नव्या पिढीचे पार आहेत. मात्र जुन्या पारांचे अस्तित्व, आठवणी तेथील आनंद घेण्यासाठी आजच्या पिढीला पुन्हा पारावर जमावे लागेल हे नक्की.

# मधुमेह आहे? मग, आजपासूनच या फळाचं ज्यूस सुरु करा!

मधूमेहींचे खाण्या-पिण्याबाबतचे अनेक समज गैरसमज असतात. पथ्यपाण्याच्या कटकटीमुळे नेमके काय खावे आणि काय टाळावे हा प्रश्न अनेकांच्या मनात असतो. फळं ही आरोग्यदायी असली तरीही त्यामध्ये नैसर्गिकरित्या साखर असल्याने त्याचा आहारात समावेश करणे त्रासदायक वाटू शकतो. म्हणूनच जाणून फळं आणि भाज्या यांचा एकत्रित समावेश करून लो ग्ल्यास्मिक इंडेक्स युक्त रस बनवा... रेड ज्युस - २ गाजर, २ टोमॅटो आणि एक लहान आकाराची भोपळी मिरची आणि त्यामध्ये अर्धी वाटी खिसलेलं खोबरं मिसळा. या मिश्रणाचा ज्युस करा. न गाळता हा ज्युस पिणं अधिक फायदेशीर आहे. यामध्ये व्हिटॅमिन ए, ॲन्टीऑक्सिडंट घटक, मॅक्रो आणि मायक्रो मिनरल्स असतात.



रेड ग्रीन कॉम्बिनेशन - ४ गाजरांसोबत २ कप पालकाचा रस आणि मूठभर पार्सली किंवा पुदीन्याची पानं मिसळा. या स्मुदीमध्ये व्हिटॅमिन ए, व्हिटॅमीन बी ६, आयर्न, मिनरल्स मुबलक असतात यामुळे कोलेस्ट्रेरॉल व ब्लड शुगरची पातळी नियंत्रणात ठेवण्यास मदत होते.

स्पाईसी ज्युस - ४ गाजरं, ५ टोमॅटो, एक मूळा, लहानसा आल्याचा तुकडा, २ मिरच्या यांची स्मुदी बनवा. ही स्मुदी न गाळता प्या.

# धाडसी क्रांतीकारक - मनोरंजन सेन गुप्ता

गाऊ त्यांना आरती : शिरीष चिटणीस
कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद

मनोरंजन सेन गुप्ता हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक धाडसी क्रांतीकारक. बाघा जतीन (जतींद्रनाथ मुखर्जी) यांच्या नेतृत्वाखाली मनोरंजन सेन गुप्ता यांनी ब्रिटिश शासनाविरुद्ध भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढा दिला आणि फाशीची शिक्षा भोगली. फाशी झालेल्या क्रांतीकारकांपैकी एक महत्वाचे नाव म्हणजे मनोरंजन सेन गुप्ता. मनोरंजन सेन गुप्ता यांचा जन्म १८९८ मध्ये पूर्व बंगालच्या (आताचे बांगलादेश) फरीदपूर जिल्ह्यातील खैरभंगा गावी झाला. त्यांचे वडील हलधर सेन गुप्ता हे स्थानिक जमीनदारांकडे लेखाकार होते. ते इंग्रज शासनाच्या विरोधी विचारांचे होते. वडिलांच्या या विचारांमुळे आणि घरातील चर्चांमुळे मनोरंजन सेन गुप्ता हे बालपणीच क्रांतीकारकांच्या संपर्कात आले.

लाठी आणि तलवार चालवण्यात ते निपुण होते. त्यांचे मोठे भाऊ प्रफुल्ल सेन गुप्ता हे मदारीपूर हायस्कूलचे शिक्षक होते. दुसरे भाऊ चित्तरंजन सेन गुप्ता हे होमिओपॅथिक डॉक्टर आणि स्वातंत्र्यसैनिक होते.

वयाच्या १२-१३ व्या वर्षीच मनोरंजन गुप्ता हे मदारीपूर ब्राती समिती आणि नंतर मदारीपूर सदस्य झाले, जी जुगांतर पक्षाची मुख्य शाखा होती. पूर्णचंद्र दास यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी या संघटनेत भारताच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतीकारी कारवाया सुरू केल्या. स्थानिक शेतकरी आणि विद्यार्थ्यांना एकत्र करून क्रांतीकारी संघटना उभी केलेल्या पूर्णचंद्र दास यांचे मनोरंजन गुप्ता हे अत्यंत प्रिय शिष्य होते. फरीदपूरमधील जमीनदार व ब्रिटिश संस्थांवर हल्ले करून शस्त्रे, पैसा लुटण्यामध्ये आणि हा लुटलेला पैसा गदर पार्टी तसेच बंगाल क्रांतीकारकांना पाठवण्यामध्ये पूर्णचंद्र दास यांच्याबरोबर मनोरंजन गुप्ता यांचा सहभाग होता.

फरीदपूर कट

फरीदपूर कट म्हणून भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात प्रसिद्ध असलेल्या प्रकरणाचे मनोरंजन सेन गुप्ता आणि त्यांचे गुरु पूर्णचंद्र दास हे प्रमुख होते. फरीदपूर कटामध्ये जमीनदार, ब्रिटिश कोतवाल आणि पोलीस स्टेशनवर हल्ले करण्यात आले. यामुळे स्वातंत्र्यलढा खेडोपाडी पसरवण्यास मदत झाली.

मनोरंजन सेन गुप्ता आणि चित्तप्रिय रायचौधरी यांच्या नेतृत्वात ब्रिटिश विश्वासपात्र बंगाली जमीनदारांच्या घर-ावर हल्ले करण्यात आले. हे हल्ले यशस्वी झाल्यानंतर ब्रिटिश गुप्तहेर अधिकारी चार्ल्स टेगार्टने याविरुद्ध मोठी यंत्रणा उभी करीत १९ डिसेंबर १९१३ रोजी पूर्णचंद्र दास, मनोरंजन सेन गुप्ता यांच्यासह इतरांना अटक करुन हा कट उघडकीस आणला. १९ डिसेंबर १९१३ ते २० एप्रिल १९१४ पर्यंत न्यायालयाने त्यांना कठोर तुरूंगवासाच्या शिक्षा ठोठावल्या. तुरूंगातून सुटल्यानंतर मनोरंजन सेन गुप्ता हे बाघा जतीन गटात सामील झाले. या कालावधीत बंगालमध्ये फरिदपूर प्रकरणापासून ब्रिटिश प्रशास-नाला खालच्या स्तरापासून हादरविण्याची सुरूवात झाली. हिंदू जर्मन कटातील बंगालचे प्रमुख नेते बाघा जतीन होते. ज्यांनी जर्मन साम्राज्याच्या मदतीने ब्रिटिश राजवटीविरुद्ध सशस्त्र विद्रोहाची योजना



आखली. १९१४ च्या महायुद्धात ब्रिटिश कमकुवत असताना बाघा जतीन यांनी कोलकाता येथे जर्मन क्राऊन प्रिन्सशी संपर्क साधला. झालेल्या भेटीत बाघा जतीन आणि त्यांच्या सहकार्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी शस्त्रपुरवठा करण्याची मागणी प्रिन्स यांच्याकडे केली. जी जर्मन परराष्ट्र मंत्रालयाने बर्लिन कमिटीमार्फत मंजूर केली. गदर पार्टी, बर्लिन कमिटीसोबत हिंदू-जर्मन षडयंत्र रचले. ओडिशा किनार्यावर जर्मन हत्यारे उतरवण्याची योजना होती. रासबिहारी बोस उत्तर भारतात बंड करण्यासाठी मदत करत होते. यासाठी शस्त्र भरलेले मॅव्हेरिक जहाज जर्मनीकडून शांघाईहून बालासोर (ओडिशा) किनार्यावर उतरवण्याची योजना आखण्यात आली. यासाठी मयूरभंज जंगलात मनोरंजन सेन गुप्ता, निरेंद्रनाथ दास गुप्ता यांनी व इतरांनी तयारीही केली. कोलकात्यातील १४ व्या राजपुर रेजिमेंटला बंड करवून मद्रास रेल्वे लाइन तोडणे, बंगाल काबीज करणे आणि पंजाब-मेरठ विद्रोहाशी जोडणे तसेच रासबिहारी बोस यांच्या पंजाब योजनेबाबत समन्वय साधणे अशा प्रकारच्या योजना आखण्यात आल्या होत्या. मॅव्हेरिक जहाज योजना ही बाघा जतीन आणि जुगांतर दलाची हिंदू-जर्मन कटातील १९१५ सालची प्रमुख शस्त्र आयात योजना होती. जर्मनीकडून शस्त्रे भरलेले जहाज शांघाईहून बालासोर (ओडिशा) किनार्यावर उतरवणे अशी ही योजना होती.

ब्रिटिश गुप्तहेर चार्ल्स टेगार्ट याने मनोरंजन सेन गुप्ता आणि पूर्णचंद्र दास यांच्या दरोडेखोर्यातून जुगांतर दलाशी त्यांचा असलेला संपर्क मिळविला. जर्मन परराष्ट्र मंत्रालयाचा बर्लिन कमिटीशी झालेला पत्रव्यवहार मिळविण्यात यश मिळविले आणि तो ब्रिटिश शासनाकडे उघड केला. सप्टेंबर १९१५ मध्ये बालास-ोरजवळ ब्रिटिशांना ही योजना उघड झाली. मॅव्हेरिक जहाज शांघाई बंदरातून बाहेर पडताच चार्ल्स टेगार्टच्या माहितीवरून बटावा बेटाजवळ ते जप्त करण्यात आले. ५०० रायफल्स, पिस्तुले आणि बॉम्ब जप्त करीत 'बाघा जतीन' गटाची योजना उधळली गेली. तसेच चार्ल्स टेगार्ट याने 'बाघा जतीन', चित्तप्रियराय चौधरी, मनोरंजन सेन गुप्ता, नीरेंद्रनाथ दास गुप्ता आणि ज्योतिषचंद्र पाल यांचा पाठलाग चालू केला. बालासोरच्या अरण्यात हे सर्व असल्याची बातमी चार्ल्स याला समजली. चार्ल्स टेगार्ट यांचे सशस्त्र पोलीस दल तर बालासोर अरण्यात निघालेच; परंतु चार्ल्सने 'दरोडेखोरांच्या एका टोळीला पकडायचे आहे' असे खोटेच सांगून एक हजार खेडूतांनाही गोळा केले. एका बाजूला बाघा जतीन, मनोरंजन सेन गुप्ता आणि इतर तीन थकलेले, भुकेले क्रांतीकारक, तर दुसर्या बाजूला एक सहस्त्र खेडूतांसहीत शस्त्रसज्ज सैनिक असे हे युद्ध बालासोराच्या अरण्यात ९ सप्टेंबर १९१५ रोजी झाले. चित्तप्रियराय चौधरी पोलीस दलाच्या गोळीबारात धारा-तीर्थी पडले, तर 'बाघा जतीन' यांना जबर जखमा झाल्या. ते खाली पडले आणि पाणी असे क्षीण आवाजात म्हणू लागले. १७ वर्षाच्या मनोरंजन सेन गुप्ता यांनी जवळच्या पाणवट्यावर जाऊन 'बाघा जतीन' यांना पाणी देण्यासाठी आपली चादर भिजवू लागला, ते पाहून शत्रूच्याही डोळ्यात पाणी तरळले, कारण हे काही दरोडेखोर नव्हते, तर भारताच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी लढणारे वीर होते. ब्रिटिश सैनिकांनी आपल्या हॅटमधून पाणी आणून 'बाघा जतीन' यांना दिले. 'बाघा जतीन' व इतर तिघांना जखमी अवस्थेत कटकच्या हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेण्यात आले.

१० सप्टेंबर १९१५ रोजी बाघा जतीन यांना वीरमृत्यू झाला. या लढ्यात पाचही क्रांतीकारकांनी मौझर पिस्तुलांनी ७५ मिनिटे ब्रिटिश सैन्याबरोबर लढा दिला. खेडूतांना जेव्हा स्वातंत्र्यसैनिक आहेत हे समजल्यावर स्थळ हुडकून दिल्याबद्दल प्रचंड दुःख त्यांना झाले. गंभीर जखमा असतानाही महिन्याभरात कोर्ट केस संपवून १६ ऑक्टोबर १९१५ रोजी मनोरंजन सेन गुप्ता आणि निरेंद्रनाथ दास गुप्ता यांना मृत्यूदंडाची (फाशीची) शिक्षा ठोठावण्यात आली. ज्योतिषचंद्र पाल यांना काळ्या पाण्याची जन्मठेप ठोठावण्यात आली. ३ डिसेंबर १९१५ रोजी मनोरंजन सेन गुप्ता व निरेंद्रनाथ दास गुप्ता यांना बालासोर तुरुंगात फाशी देण्यात आले. ज्योतिषचंद्र पाल यांना अंदमान तुरुंगात काळ्या पाण्याची शिक्षा भोगण्यासाठी पाठविण्यात आले. तेथे होत असलेल्या पोलिसांच्या क्रूर यातनांमुळे मानसिक विक्षिप्त कुठरबिद्ध अवस्थेत (वेड लागले) ते होते. बहरामपूर उन्माद आश्रम (पश्चिम बंगाल) येथे ४ डिसेंबर १९२४ रोजी त्यांचा मृत्यू झाला. ज्योतिषचंद्र पाल हे बाघा जतीन गटातील अनाम शहीदांपैकी एक, ज्यांना तुरुंग यातनांनी संपवले. बाघा जतीन, मनोरंजन सेन गुप्ता आणि इतर तिघा स्वातंत्र्य सैनिकांच्या शौर्याने ब्रिटिश अधिकारी चार्ल्स टेगर्ट भावुक झाले. हे क्रांतिकारकांचे कार्य बंगाल क्रांतीला प्रेरणा देणारे ठरले. या घटनेनंतर झालेल्या प्रेरणेने अनेक क्रांतिकारी गदर पार्टीत सामील झाले. या पाचही क्रांतिकारकांचे नाव बंगालच्या क्रांतिकारी इतिहासात अमर आहे.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा



वैवाहिक जीवन सुरळीत असली की मनुष्य आनंदी राहतो. परंतू अनेकदा असंतोष, सुख न मिळणे कमजोरी अशा काही समस्या उद्भवतात. अशात पुरुषांमध्ये कमजोरी डिप्रेशनचे कारण देखील होऊ शकतं. पण त्यात घाबरण्यासारखे काही नाही. पुरुषांमध्ये कमजोरी दूर करण्यासाठी काही घरगुती पदार्थ आहे ज्यामुळे नैसर्गिक रित्या या समस्या सोडवल्या जाऊ शकतात तर जाणून घ्या कोणते असे पदार्थ आहे जे सेवन केल्याने पुरुषांना नक्कीच फायदा होईल.

## २ Joke — विनोद




एका शिक्षिकेने विद्यार्थ्यांना क्रिकेट मॅचवर एक निबंध लिहायला सांगितला. तास संपत आल्यावर बाई निबंध पहायला गेल्या. एका आळशी मुलाने फक्त दोनच वाक्य लिहिली होती. 'वाईट हवामान, पाऊस पडत असल्यामुळे क्रिकेटची मॅच होणार नाही. '

## ३ Message — संदेश



Arj kiya hai....Jara gaur Farmayega !!
Kabhi tum gaur se dekho aaina
Kabhi tum gaur se dekho aaina
....tum bhi ho Made in China

## ४ Thought — सुविचार




त्याग हा सर्व प्रकारच्या कलेचा बिंदूच आहे.
- महात्मा गांधी

**संस्कृत सुभाषित**

**विद्याघातो ह्यनभासः, स्त्रीणां घातः कुचलैता ।। व्याधींना भोजनं जीर्णं, शत्रोर्धातः प्रपज्जता।। विद्या प्राप्त करण्यामध्ये अभ्यास**

अर्थः टाळणे हे घातक ठरते, मलिन-फाटकी वस्त्रे स्त्रीच्या सौंदर्याला घातक ठरतात, भोजन चांगले पचत असेल तर ते रोगांना घातक ठरते (अन्न चांगले पचल्यास रोग फिरकत नाहीत) आणि आपल्या सामर्थ्याचे प्रदर्शन शत्रूंना घातक ठरते.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. सवड
४. नाणेफेक
८. टेचात, थाटामाटात
११. सैन्याचा मालपुरवठा
१३. घासात बारीक खडे यावेत तशी तापदायक बडबड
१६. खास खबर
१९. बेताचे गरम
२०. घाटा
२१. गोडी, आवड
२३. पदार्थ शिजतानाचा आवाज
२५. अंधार
२७. चामखीळ
२९. वास्तव्य, अस्तित्व
३०. सत्व
३१. चाकोरीसाठी मराठीत रूळलेली इंग्रजी शब्द
३३. उपहास
३४. विनाप्रयत्ने, सहजगत्या
३६. अपशकुन
३८. सरस-निरस (भाव)
४०. भारवाहक
४१. रानटी, जंगलातील
४२. अगदी दूर, पलीकडे
४५. श्रवणाचा अवयव
४८. वेळ घालविणे
४९. झोपाळा
५०. तमाशातील कलाकार
५३. पाढ्यांची उजळणी
५४. शिव्यशाप
५७. उंचसखल नसलेले
५८. सूर्याचे एक नाव
६०. भेग, चीर
६१. काठाकाठाने
६३. धावपळ, भीतीने पांगापांग
६५. शर्त, पण
६६. बटवा
६८. लव्ह लेटर पण मराठीत
७०. राजाची मुलगी
७२. कोलकताचे विमानतळ
७४. घट्ट, तणावपूर्ण
७५. सर्दीने बंद होणारे
७६. कलावंत
७९. धुंदी, कैफ
८३. पत्रातील सा.न.वि.वि.

### उभे शब्द

१. स्फुरण (पावणे)
२. फळातील द्रव
३. घर, निवास
५. शेराचा चौथा भाग
६. बिशाद, हिंमत
७. रोख पैसा, रोकड
९. कारभार, कामगिरी (हिंदी)
१०. घेराव, गराडा
१२. गहन
१४. डोईवरचा पूर्ण चंद्र!
१५. जिभेचे चोचले पुरवणारे
१७. आशीर्वाद
१८. क्रिकेटमधील सहा
२०अ. सहाआसनी रिक्षाला बोलीभाषेतील शब्द
२२. अगदी सारखे
२४. जीभ
२६. बोरबरी
२८. मजेसाठी पर्यटन
२९. गाईचे पिल
२९अ. सहाआसनी रिक्षाला बोलीभाषेतील शब्द
३२. पुरुष
३५. प्राण
३७. पत्र, डाक
३९. न्यारी, रीत!
४०. उचलबांगडी
४३. गूढ
४४. शंकराने धारण केलेल विष
४६. वर्तमानपत्र (हिंदी)
४७. स्वारांचे शास्त्र व कला
४८. पाणी वाढण्याचे भांडे
५०. काव्यात तुझे
५१. गोंधळ, थट्टा, भांडण
५२. समोर (हिंदी)
५५. काठ, किनारा
५६. बोटांनी दारावर आवाज
५७. रोखठोक, स्पष्ट
५९. कोयत्याचा साथीदार
६२. धमकी
६४. खाट, बाज
६५. बोकड
६६. नरमच्या विरुद्ध
६७. चार वेदांपैकी एक
६८. कधी रसिक, कधी बघ्या
७०. राधाकृष्ण (हिंदी)
७१. समतोल बुद्धीचा
७३. मज्जाव, बंदी
७७. लग्नाचे पारंपारिक मिष्टान्न
७८. पृथ्वी
७९. जोगीण (इंग्रजी)
८०. भारताचा राष्ट्रीय पक्षी
८१. पांडवांची आई
८२. पहिली रास

### आडवे उत्तरे

१.करवत ४.छापाकाटा ८.झकपक ११.रसद १३.कचकच १६.नवलविशेष १९.कोमट २०.तूट २१.रस २३.रटरट २५.तमस २७.मस २९.वास ३०.कस ३१.रूटीन ३३.टर ३४.सहजासहजी ३६.नाट ३८.तरतम ४०.हमाल ४१.वन्य ४२.पार ४५.कान ४८.कालहरण ४९.झूला ५०.तमासगीर ५३.परवचा ५४.तळतळाट ५७.समतल ५८.रम ६०.फट ६१.कडेकडेने ६३.पळापळ ६५.अट ६६.कसा ६८.प्रेमपत्र ७०.राजकन्या ७२.डमडम ७४.तंग ७५.नाक ७६.कलाकार ७९.नशा ८३.साष्टांग नमस्कार विनंती विशेष

### उभे उत्तरे

१.फुरफुर २.रस ३.वदन ५.पावशेर ६.टाप ७.रकम ९.करतूत १०.कडे १२.खोल १४.चकोट १५.चटपटीत १७.वर १८.षटक २०अ.टमटम २२.समसमान २४.रसना २६.टर २८.सहल २९.वासरु २९अ.सह ३२.नर ३५.जीव ३७.टपाल ३९.तऱ्हा ४०.हकालपट्टी ४३.रहस्य ४४.हलाहल ४६.समाचारपत्र ४७.संगीत ४८.कावळा ५०.तव ५१.रळफळ ५२.सामने ५५.तट ५६.टकटक ५७.सडेतोड ५९.मळा ६२.दम ६४.पलंग ६५.अज ६६.कडक ६७.साम ६८.प्रेक्षक ७०.राधेशाम ७१.न्यायी ७३.मना ७७.लाडू ७८.रसा ७९.नन ८०.मोर ८१.कुंती ८२.मेष

# वन्यजीव प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीचे अनुदान द्यावे- नानाजी खाकरे

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यातील शेतकर्यांचे वन्यजीव प्राण्यांच्या उपद्रवांमुळे मोठे आर्थिक नुकसान होत असून त्याचा फटका सर्वसामान्य शेतकर्यांना बसत आहे. याची भरपाई म्हणून सरकारने आर्थिक स्वरूपात मदत करावी अशी मागणी भारतीय किसान संघाचे अखिल भारती जैवीक शेती प्रमुख नानाजी आखरे यांनी आयोजीत पत्रकार परिषदेत केली. यावेळी महाराष्ट्र प्रांत संघटन मंत्री चंदन पाटील, जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले, जिल्हा मंत्री सतीश देशपांडे तावशीकर आदिंची उपस्थिती होती.

भारतीय किसान संघाच्या वतीने लातूर येथील संघ कार्यालयातील जिल्ह्यातील शेतकर्यांच्या प्रश्नांवर बैठक आयोजीत करण्यात आली होती. यावेळी त्यांनी शेतकर्यांना शेतीमालाला उत्पादन आधारीत खर्चावर दीडपट अधिक भाव मिळाला पाहिजे अशी किसान संघाची मागणी आहे.




भारतीय किसान संघही देशभर शेतकर्यांच्या प्रश्नांवर संघर्ष करणारी पक्षविरहीत संघटना आहे. शेतकर्यांच्या प्रश्नांसाठी संस्थापक अध्यक्ष दत्तोपंत ठेंगडी ४ मार्च १९७९ रोजी या संघटनेची स्थापना केली. महाराष्ट्रातील ७० हजार गावांतून ग्रामसमिती नेमली असून त्या समितीमार्फत शेतकर्यांना जैवीक शेतीसाठीचे मोफत प्रशिक्षण दिले जात आहे. संघटनेच्या वतीने शेतकर्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविला जातो. शेतकरी एकजुटीसाठी देशभर प्रयत्नशील असलेल्या या संघटनेने महाराष्ट्रातील शेतकर्यांना सरकारने एफआरपीनुसार भाव जाहीर करण्या संदर्भात प्रस्ताव दिला होता. त्यानुसार सरकारने एफआरपी दिली असली तरी प्रत्यक्षात मात्र शेतकर्यांच्या पदरात काहीही पडत नाही. शासनाने हमीभाव केंद्रे जरी उभारली असली तरी ही खरेदी केंद्रे उशिरा सुरू होत असल्याने व शेतकर्यांना मजबुरीने बाजारात माल विकावा लागतो त्यामुळे शेतकर्यांचे नुकसान होत आहे. या नुकसानीची भरपाई म्हणून भावांतर योजनेअंतर्गत मदत द्यावी जेणेकरून सकारला खरेदी केंद्रासाठी लागणारे मनुष्यबळ व इतर खर्च करावा लागणार नाही. यासाठी आम्ही महाराष्ट्र सरकारकडे भावांतर फरकाचा प्रस्ताव दिला आहे तो अंमलात आणावा, असेही खाकरे यांनी यावेळी नमुद केले. विविध प्रश्नांवर आयोजीत बैठकीत लातूर जिल्ह्यातील शेतकर्यांच्या प्रमुख तीन मागण्या समोर आलेल्या आहेत. त्याच्या पूर्ततेसाठी आम्ही जिल्हा प्रशासनाकडे जिल्हाध्यक्षांमार्फत निवेदन देऊन मागणी करणार आहोत. ही मागणी वेळेत पूर्ण न झाल्यास येत्या २४ मार्च रोजी आंदोलन करण्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला.

लातूर जिल्ह्यातील शेतकर्यांना वन्यजीव प्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. या नुकसानीपासून बचाव करण्यासाठी कुंपन योजना सुरू केली असली तरी त्याची तरतूद अत्यल्प आहे. या वन्यजीव प्राण्यांचा सरकारनेच बंदोबस्त करावा अथवा शेतीला कुंपन करण्यासाठी योग्य ती मदत शेतकर्यांना करावी. तसेच येणार्या काळात शेतकर्यांचा हरभरा हा बाजारात येणार असून त्यासाठी खरेदी केंद्रे तात्काळ सुरू करावीत, जेणेकरून शेतकर्यांच्या हातात योग्य मोबदला मिळेल. शासकीय यंत्रणा व त्यात बसलेले अधिकारी हे जाणीवपूर्वक उशिरा खरेदी केंद्र सुरू करतात त्यामुळे नाविलाजास्तव शेतकर्यांना कमी भावात माल विकावा लागतो. तसेच शेतकर्यांच्या पाणंद रस्त्यांचा विषयही लवकरात सरकारने सोडवावा. आदी वरील तीन मागण्या या लातूर जिल्ह्यातील शेतकर्यांच्या महत्वपूर्ण असून याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा भारतीय संघाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी प्रांताध्यक्ष नवनाथ मद्दे, जिल्हामंत्री सतीश देशपांडे तावशीकर तर कोषाध्यक्ष शेखर मराठे, प्रसिद्धीप्रमुख संजय देशपांडे आदिंची उपस्थिती होती.

## लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालयात अटकावून ठेवलेल्या वाहनांचा होणार लिलाव

**लातूर/प्रतिनिधी :** येथील प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे मोटार वाहन कर जमीन महसूल आदी थकबाकीमुळे अटकावून ठेवलेल्या जंगम मालमत्तेची (वाहनांची) विक्री लिलाव प्रक्रियेद्वारे होणार आहे. हा लिलाव १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १२ ते दुपारी ३ वाजेदरम्यान ऑनलाइन पद्धतीने पार पडेल.

लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून वाहन धारकांना थकबाकी भरण्याची संधी दिल्यानंतरही वाहने सोडविली न गेल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. अटकावून ठेवलेल्या वाहनांची यादी, लिलावाच्या अटी व शर्ती तसेच इतर तपशील https://www.eauction.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाने केले आहे.

## भगवान गिरी यांचे दु:खद निधन

**अहमदपूर/प्रतिनिधी :** भारतीय जनता पक्षाचे माजी जिल्हा उपाध्यक्ष गोविंद गिरी यांचे वडील भगवान रामराव गिरी यांचे नुकतेच निधन झाले असून अहमदपूर तालुक्यातील त्यांचे



मुळ गाव असलेल्या मौजे मानखेड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. भगवानराव गिरी वय ८७ यांचे अल्पशा आजाराने अहमदपूर येथील निवासस्थानी ५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० दुखत निधन झाले . काल सायंकाळी त्यांचे मुळगाव असलेल्या मौजे मानखेड येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अहमदपूर तालुक्यातील भारतीय जनता पक्षाचे सर्व नेते कार्यकर्त्या सह सर्व राजकीय पक्षाचे, सामाजिक क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांसह मानखेड सोनखेड व पंचक्रोशीतील जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता. भगवानराव गिरी यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले चार मुली सुना व नातवंडे असून गोविंद गिरी व बालाजी गिरी यांचे ते वडील होत.मृतात्म्यास शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना-संपादक

## सोलापूर विभागाच्या तत्पर कारवाईमुळे हरवलेली सोन्याची साखळी परत मिळाली

**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या, सोलापूर विभागाने जलद आणि समन्वित कारवाईद्वारे प्रवासी सेवेप्रती आपली वचनबद्धता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे, ज्यामुळे एका महिला प्रवाशाने ट्रेन प्रवासादरम्यान गमावलेली सोन्याची साखळी यशस्वीरित्या परत मिळवण्यात आली.

प्रवासी ट्रेन क्रमांक ११३१२ (हासन-सोलापूर एक्सप्रेस) मधून प्रवास करत असताना, प्रवासादरम्यान चुकून सोन्याची साखळी




शौचालयाच्या कमोडमध्ये पडली. गाडीतील कर्मचाऱ्यांनी तात्काळ प्रयत्न करूनही, ती वस्तू सापडली नाही. संबंधित प्रकरणात ६ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे रेल मदत पोर्टलद्वारे रेल्वेकडे मदतीसाठी तात्काळ तक्रार नोंदवण्यात आली.

सदरची ट्रेन सोलापूर स्थानकावर पोहोचल्यावर, सोलापूर विभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई केली. प्रवाशाला समजावून सांगून धीर देण्यात आला, त्यानंतर यांत्रिक विभागाच्या कॅरेज आणि वॅगन शाखेच्या बायो-टॉयलेट देखभाल पथकाने, कर्तव्यावर असलेल्या रेल्वे सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांच्या समन्वयाने, बायो-टॉयलेटच्या टाकीतून सोन्याची साखळी काळजीपूर्वक बाहेर काढली. त्यानंतर, ती सापडलेली वस्तू आरपीएफ कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत सुरक्षितपणे प्रवाशाच्या ताब्यात देण्यात आली. रेल्वे कर्मचाऱ्यांनी दिलेल्या तत्पर प्रतिसादाबद्दल आणि समर्थनाबद्दल प्रवाशाने समाधान आणि कृतज्ञता व्यक्त केली. सोलापूर विभाग हा प्रवाशांची सुरक्षा, तक्रारींचे त्वरित निवारण आणि सर्वकाळ सहानुभूतीपूर्ण सेवा सुनिश्चित करण्यासाठी कटिबद्ध आहे.

# लातूर येथे श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांचा ७४० वा पुण्यतिथी महोत्सव उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** येथील श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांचा ७४० वा पुण्यतिथी महोत्सव मोठ्या भक्तिभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळी महाराजांच्या मूर्तीला अभिषेक व महापूजा समाज बांधव श्री व सौ. कुमार अडाणे यांच्या यजमानपदाखाली पार पडली. त्यानंतर सकाळी ११ वाजता सराफ लाईन येथून भव्य मिरवणुकीचा शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर व नगरसेवक गणेश गवारे यांच्या शुभहस्ते करण्यात आला.यावेळी मान्यवरांचा समाजाच्या वतीने सत्कार





करण्यात आला.व ही मिरवणूक राजेश बागडे यांच्या दुकानासमोर स्वागत कार्यक्रमात माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

दुपारी किर्तन, त्यानंतर गुलाल व दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. याप्रसंगी मंदिर प्रभागाच्या नगरसेविका सौ. अदितीताई कव्हेकर तसेच ऋषिकेश राजे यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर महाप्रसादास सुरुवात करण्यात आली असून सुमारे ३००० ते ३२०० भाविक व समाज बांधवांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष श्री. राजाभाऊ बोकन, पुण्यतिथी महोत्सव समितीचे कुमार अडाणे, नितीन बागडे, अजय भुमकर, रमेश अडाणे,शैलेश टेहरे, सुनील वाडकर, गजेंद्र बोकन,बंडू शहाणे, सचिन अडाणे,सुजित बोकन,विलास भुमकर, अजय बोकन,गजानन उडानशीव,चंद्रकांतराव मुंडलिक,ओंकार डहाळे तसेच सर्व समाज बांधवांनी विशेष परिश्रम घेतले.

## विद्यार्थ्यांनी स्वत:ला आवडेल त्या क्षेत्रात करिअर करावे- श्री. रमेश बिरादार




**लातूर/प्रतिनिधी :** प्रत्येकामध्ये काही कलागुण उपजतच असतात कोणाला गायला आवडते, काहींना नाचायला,लिहायला,चित्रकला आदी कलागुण जोपासायला आवडतात. परंतु निश्चित ध्येय ठेवून त्यादृष्टीने सातत्याने कार्य करायला सुरुवात केली तर स्वतःला आवडेल त्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना आपला पर्यायाने देशाचा नावलौकिक निर्माण करता येतो.त्यामुळे विद्यार्थ्यांनी या १२ वी नंतरच्या टप्प्यावर स्वतःची आवड विचारत घेऊन ध्येय निश्चित करावेव असे प्रतिपादन ग्लोबल नॉलेज पब्लिक स्कूल,लातूर चे संचालक श्री.रमेश बिरादार यांनी केले.ते सरस्वती संगीत कला महाविद्यालय,लातूर येथे आयोजित १२ वी च्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रम समारंभप्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालमणी डॉ. राम बोरगावकर हे होते.तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री.रमेशजी बिरादार,सुप्रसिद्ध वास्तू तज्ञ श्री.राहुल पाटील,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.पांडुरंग गोरे,उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध वास्तू विशारद श्री.राहुल पाटील म्हणाले की,विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करत ध्येय साधना केली तर यश निश्चित मिळते.असे विचार त्यांनी यावेळी व्यक्त केले.

याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.श्रीमंत दोरवे यांनी केले. प्रास्ताविक प्रा.तुकाराम येमले यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.डॉ. राम खलंग्रे यांनी मानले.

## दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीचा इन्क्विटी टेक्नॉलॉजिज कंपनीशी सामंजस्य करार

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद एज्युकेशन सोसायटी संचलित दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, लातूर आणि पुणे येथील नामांकित इन्क्विटी टेक्नॉलॉजिज (इन्क्यूब फार्मा प्रायव्हेट लिमिटेड) या कंपनीमध्ये नुकताच सामंजस्य करार (एम.ओ.यू.) करण्यात आला. या करारामुळे फार्मसी विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण, संशोधन व करिअर संधींचे नवे दालन खुले होणार आहे.

या सामंजस्य कराराअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण, संशोधन उपक्रम, मेडिकल कोडिंग, फार्माकोव्हिजिलन्स तसेच रेग्युलेटरी अफेअर्ससारखे व्यावसायिक व रोजगाराभिमुख कोर्सेस राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन मिळून भविष्यातील नोकरीच्या संधींसाठी भक्कम व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. कराराप्रसंगी इन्क्विटी टेक्नॉलॉजिजकडून शार्दूल भोसले (हेड सी.एस.आर. अँड कॉलेज कोलॅबोरेशन) आणि आतिष जाधव (हेड प्लेसमेंट अँड कॉर्पोरेट कोलॅबोरेशन) हे प्रतिनिधी उपस्थित होते. दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी प्रा. प्रतीक चिंचोले व प्रा. ओम पाटील तसेच शिक्षण संस्थेचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. अनिल बिरादार यांनी या करारासाठी विशेष पुढाकार घेतला.

इन्क्यूब फार्मा ही कंपनी सौंदर्य प्रसाधने, बेसिक केमिकल्स तसेच फार्मास्युटिकल फॉर्म्युलेशन्सच्या निर्मिती क्षेत्रात कार्यरत असून, उद्योग व




शिक्षण यांतील दरी कमी करण्यासाठी विविध उपक्रम राबवित आहे. या सामंजस्य कराराबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा तसेच सर्व विभागप्रमुख व प्राध्यापकवृंद यांनी संस्थेचे अभिनंदन करून समाधान व्यक्त केले.

## दयानंद विज्ञानमध्ये 'हिंद की चादर' गीत व माहितीपटाचे सादरीकरण

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.०५ फेब्रुवारी २०२६ रोजी हिंदी विभागाच्या वतीने सतींदर सरताज यांचे हिंद की चादर या गीताचे व माहितीपटाचे सादरीकरण प्रोजेक्टरच्या माध्यमातून करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार व महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांच्या सूचनेनुसार शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी शताब्दी वर्षानिमित्त गीताचे तसेच माहितीपटाचे आयोजन करण्यात आलेले होते.या माध्यमातून गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी धर्मस्वातंत्र्य, मानवी मूल्ये व अन्यायाविरुद्ध दिलेल्या महान बलिदानाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.हिंदी विभाग प्रमुख डॉ.गजानन बने यांनी या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये धर्मनिरपेक्षता, सहिष्णुता, सामाजिक ऐक्य व राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत करणे आहे असे सांगितले,तर माहितीपट सादरीकरणानंतर डॉ.शेटकार रामशेट्टी यांनी



विद्यार्थ्यांशी संवाद साधला.त्यांनी गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या जीवनकार्यावर चर्चा करून त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.विद्यार्थ्यांनी या गीताबद्यल व माहितीपटाबद्दल उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिल्या.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये तेगबहादूर साहिबजी यांच्या कार्याची प्रेरणा व नैतिक मूल्यांची जोपासना झाली.या कार्यक्रमासाठी मानसी गायकवाड, सुनील राक्षे, बालाजी यमपुरे,शंकर भालके यांचेही सहकार्य लाभले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# विकसित भारत २०४७ च्या स्वप्नासाठी केंद्राच्या विविध कल्याणकारी योजना

## प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांचे प्रतिपादन

**अहमदपूर/प्रतिनिधी:** भारत सरकारने विकसित भारत २०४७ चे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विविध लोक कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत. त्या आधारावर भारत सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, संरक्षण, विज्ञान-तंत्रज्ञान आदीं क्षेत्रामध्ये विशेष प्रगती करीत आहे, यातूनच भारताने जागतिक महासत्तेकडे देदीप्यमान वाटचाल सुरू केली असून प्राचीन काळातील विश्वगुरू भारत पुन्हा एकदा जगाचे नेतृत्व करेल, असे स्पष्ट प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी केले.

येथील महात्मा फुले महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या तसेच किसान शिक्षण प्रसारक मंडळ उदगीरचे माजी अध्यक्ष कै. अशोकराव पाटील एकंबेकर यांच्या ७५ व्या जयंती निमित्त '' जागतिक गावाक्षातून विकसित भारत - २०४७'' या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चर्चासत्राचे संयोजक व लेखक प्राचार्य डॉ वसंत बिरादार हे होते. तर प्रमुख उपस्थितीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे प्र- कुलगुरू डॉ. अशोक महाजन हे होते. तर विशेष निमंत्रित मार्गदर्शक तोकुसिमा विद्यापीठ जपानच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील प्रो.डॉ. रिषी मुराकामी हे होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या सामाजिक शास्त्र विभागाचे संचालक प्रो. डॉ. प्रमोद लोणारकर, विविध उपस्थितीत अहमदपूरच्या एमजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही.पी. पवार, आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे संयोजक उपप्राचार्य प्रो. डॉ. दुर्गादास चौधरी, सह संयोजक प्रो. डॉ. अभिजीत मोरे , छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. बब्रुवान मोरे आदींची उपस्थिती होती. समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनीषा झोल यांनी तर आभार प्रा. सुमीत कुमठेकर यांनी मानले. या चर्चासत्रासाठी महाराष्ट्रसह देशभरातून दीडशेहून अधिक संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक, अभ्यासक उपस्थित होते.

योजनांचा सर्वांगीण विकासासाठी फायदा भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश असून भारत सरकारने तसेच विविध राज्य सरकारने लोककल्याणकारी योजना राबविल्या असून त्यामध्ये भारत सरकारच्या आत्मनिर्भर भारत, स्टार्ट ऑफ इंडिया, मेक इन इंडिया, उज्ज्वला गॅस योजना, प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री फसल बीमा योजना, अटल पेन्शन योजना, आयुष्यमान भारत, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री सूर्य घर योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना याबरोबरच डिजिटल इंडिया व स्त्री विकासासाठी महिला सबलीकरण, लाडली बहीण योजना, महिला समृद्धी योजना आदी केंद्र सरकार राबवीत असून या योजनांचा फायदा भारतीयांच्या जीडीपी वाढीबरोबरच सर्वांगीण विकासासाठी होत आहे, असे डॉ महाजन यांनी सांगितले.




# दयानंद विज्ञान महाविद्यालयात डॉ. चार्ल्स फिलीप लेब्लॉन्ड यांच्या जयंतीनिमित्त सेमिनार

**लातूर/प्रतिनिधी:** दयानंद विज्ञान महाविद्यालयात दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सुप्रसिद्ध कॅनेडियन वैज्ञानिक, कोशिकावैज्ञानिक व शरीररचनाशास्त्रज्ञ डॉ. चार्ल्स फिलीप लेब्लॉन्ड यांच्या ११९ वी जयंतीनिमित्त लुमिनार्या व्याख्यानमाला अंतर्गत विशेष सेमिनाराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात विभाग प्रमुख प्रा. अवंती बिडकर यांच्या हस्ते डॉ. चार्ल्स लेब्लॉन्ड यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. यानंतर बी.एस्सी. जैवतंत्रज्ञान प्रथम वर्षातील विद्यार्थिनी कु. विशाखा गरड हिने डॉ. लेब्लॉन्ड यांच्या जीवनकार्यावर आधारित सविस्तर सादरीकरण केले.




सादरीकरणात डॉ. चार्ल्स फिलीप लेब्लॉन्ड यांनी ऑटोरॅडिओग्राफी तंत्रज्ञानाचा वापर करून पेशी पातळीवरील प्रथिन संश्लेषण, डीएनए-आरएने-प्रथिन यांच्या परस्परसंबंधांचा सखोल अभ्यास प्रथमच स्पष्ट केल्याचे नमूद करण्यात आले. त्यांच्या संशोधनामुळे पेशी सतत नूतनीकरणाच्या प्रक्रियेत असतात, ही संकल्पना वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाली.

डॉ. लेब्लॉन्ड यांच्या संशोधनाने आण्विक जीवशास्त्र, कोशिकाशास्त्र, वैद्यकीय संशोधन व आधुनिक जैवतंत्रज्ञानाच्या विकासाला नवी दिशा दिली. त्यांनी प्रकाशित केलेल्या संशोधन लेखांमधून मूलभूत विज्ञानाचे महत्त्व, संशोधनातील शिस्त व वैज्ञानिक दृष्टीकोन अधोरेखित होतो, असे स्पष्ट करण्यात आले.

या सेमिनारमुळे विद्यार्थ्यांमध्ये कोशिकाविज्ञान, आण्विक जीवशास्त्र, संशोधनवृत्ती व वैज्ञानिक विचारशक्ती विकसित होण्यास निश्चितच चालना मिळाली.याप्रसंगी प्रा. डॉ. फिरदौस बिरादार, प्रा. ऋतुजा डिग्रसकर, प्रा. आऊ एळीकर, प्रा .श्वेता मदने , प्रा.स्वरूप गावकरे, तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी व पदवी-पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीराम विद्यालयाच्या इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**रेणापूर/प्रतिनिधी:** : रेणापूर येथील श्रीराम उच्च माध्यमिक विद्यालयात निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सिद्धेश्वर मामहमे हे होते. प्राचार्य मामडगे म्हणाले विद्यार्थ्यांना पालकांच्या कालवी जाग देवून अभ्यास करावा तसेच मोबाईलचा अतिवापर टाळावा प्रा. भरत पायगुडे यांनीही विद्याश्र्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या तर विद्यार्थ्यांनीही मनोगतातून प्रध्यापकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली सूत्रसंचलन प्रा. लड्कांत शेवाळे यांनी केले तर आभार प्रा. चंद्रशेखर मोटे यांनी मानले. यावेळी बीडा विभाग प्रमुख विवेक भातिकरे, प्रा. जुबेरखान पठाण, प्रा. विजय गिरी, प्रा. प्रकाश करमुढे, प्रा. बाळासाहेब सूर्यवंशी, प्रा. राजेश खाडए, प्रा. अक्षय अकनगीर, प्रा. गोविंद गव्हाणे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

रोज वाचा
ऑनलाईन
लातूर समाचार
www.
latursamachar.com

# झोनल क्रिकेट स्पर्धेत स्वामी विवेकानंदचा संघ विजेता

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई अंतर्गत विभागीय स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. क्रिकेट या खेळामध्ये स्वामी विवेकानंद इन्स्टिटट्यूट ऑफ पॉलीटेक्निक लातूर च्या संघाने उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत या स्पर्धेचे विजेतेपद मिळविले आहे.

क्रिकेट या खेळाचे सामने मातोश्री प्रतिष्ठान नांदेड या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. कॉलेजच्या इतिहासात प्रथमच विजेतेपदाला गवसणी घालण्याची उत्कृष्ट कामगिरी संघाने यावर्षी पार पाडली. संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेले अत्याधुनिक टर्फ क्रिकेट मैदान मोलाचे ठरले आहे. या सुविधेमुळे खेळाडूंना दर्जेदार सरावाची संधी मिळाली.

स्पर्धेपूर्वी क्रिकेट संघातील विद्यार्थ्यांनी सातत्याने, शिस्तबद्ध व कठोर परिश्रम घेतले. या यशामध्ये क्रीडा प्रमुख नितीन कांबळे, मुकेश बिराजदार यांचा सिंहाचा वाटा आहे.या ऐतिहासिक कामगिरीबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव पाटील कव्हेकर, उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, समन्वयक विनोद जाधव , प्राचार्य डॉ.लक्ष्मीकांत गौड यांनी सर्व खेळाडूंचे व मार्गदर्शकांचे कौतुक केले आहे. यावेळी खेळाडू उपस्थित होते.

लातूर । नांदेड येथे संपन्न झालेल्या ६९ व्या राष्ट्रीय नेटबॉल स्पर्धेत लातूरच्या क्रीडा वैभवात भर पडली आहे. येथील श्री श्री रविशंकर विद्यामंदिरचा गुणवंत खेळाडू आयुष ओमप्रकाश तोडकर याने महाराष्ट्र संघातून चमकदार कामगिरी करत सुवर्णपदकावर नाव कोरले. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात महाराष्ट्राने अटीतटीच्या सामन्यात मध्य प्रदेशचा पराभव करून राष्ट्रीय विजेतेपद पटकावले. आयुषने या स्पर्धेत आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत महाराष्ट्राच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. देशातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या या स्पर्धेतील यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. आयुषला या यशासाठी क्रीडाशिक्षक शिला सलगरे, दिनेश मानके, नरेंद्र स्वामी तसेच प्रशिक्षक अप्पासाहेब स्वामी व श्रेयश मठपती यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे संचालक राजेंद्र कोळगे, सुनंदा कोळगे, मुख्याध्यापिका सोनाली कुलकर्णी यांनी अभिनंदन केले.




### रमाई ...

निळासूर्य लखलख
सहचारिणी रमाई
सहजचं जुळे कर
आभाळाची निळाई

संसार गाडा ओढता
जाणवे तिची धिटाई
बाबांचे पुस्तकालय
हीचं तिजला मिठाई

गोवऱ्या विकूनि त्या
करी अत्यल्प कमाई
फाटल्या प्राक्तनाची
करत होती शिलाई

भिमराव करत होते
संविधानाची घडाई
बालपणापासून ती
करत राहिली लढाई

गरिबी विदार्ण करते
परिस्थिती रे कसाई
कणखर साथ संगत
प्रसंगसामोरे कसाही

बाबा साहेब वडील
रमाई सारखी आई
प्रगतसूर्य आज पाहे
होय देशाची भलाई

अशाथोरदाम्पत्याची
आठव येई ठाई ठाई
कष्टले अपारआपण
आज फुले आमराई

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# राज्यस्तरीय सावित्रीच्या लेकी पुरस्काराने डॉ. श्वेता सावंत आणि डॉ. सीमा सावंत सन्मानित

**लातूर/प्रतिनिधी:** डॉ. ज्ञानोबा कदम यांच्या संकल्पनेतील इंडियन इन्स्टिट्यूट कौन्सिल ही संघटना समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, विज्ञानाभिमुखता व राष्ट्रवाद या मानवी मूल्यांना प्रमाण मानून जनजागृतीचे कार्य गेल्या अनेक वर्षापासून अव्यातपणे करीत आहे. माहिती आणि तंत्रज्ञान युगातील विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापकांची समतावादी संघटना असून सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, सांस्कृतिक आणि राजकीय अशा विविध मानवी उत्थानाच्या कार्यात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते फुलेवाडा, गंज पेठ, पुणे येथे दरवर्षी सन्मानित व गौरविण्यात येते, यावर्षी लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्रा. देवदत्त सावंत आणि भाग्यश्री सावंत यांच्या दोन्हीही सुकन्या डॉ. श्वेता सावंत आणि डॉ. सीमा सावंत यांना वैद्यकीय क्षेत्रासाठी सावित्रीच्या लेकी या राज्यस्तरीय पुरस्काराने प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन पुणे येथील क्रांतीबा ज्योतिबा यांच्या फुले वाड्यात प्रसिद्ध अभिनेत्री चिन्मयी सुमंत आणि विभावरी देशपांडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी आणि गायक अरुण म्हात्रे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेत्री व रंगकर्मी श्रीमती सुषमा देशपांडे, प्रा. देवदत्त सावंत आणि भाग्यश्री सावंत यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी अभिनेत्री व ज्येष्ठ रंगकर्मी श्रीमती सुषमा देशपांडे, चिन्मयी सुमित, विभावरी देशपांडे, मुंबईच्या माजी महापौर किशोरीताई पेडणेकर, प्रा. डॉ. सरिता मालवीय, प्रा. डॉ. अरुण वाघोळे, प्राची घाणेकर, अस्मिता चांदणे, पल्लवी पुजारी, वैशाली सावळे, करुणा विमल, प्रज्ञा बाली, प्रा. डॉ. साधना चटलाणी, अंजली कुदरंगी यांनाही विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डॉ. श्वेता सावंत आणि डॉ. सीमा सावंत यांना हा अत्यंत प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल पूज्य भदंत पय्यानंद थेरो व पूज्य भंते बोधिराज यांनी आशीर्वाद रुपी शुभेच्छा तर प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, इंजि. एम. एन. गायकवाड, माजी शिक्षणाधिकारी आर. पी. गायकवाड, प्रो. डॉ. संजय गवई,



ममता गवई, देवानंद सावंत, प्रा. राजकुमार बनसोडे, सितम सोनवणे, मिलिंद धावारे आणि सतीश गायकवाड यांनी पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE 2nd call**

The Superintending Engineer (Parli Circle) on behalf of MSETCL (the Employer) invites online bids (SRM E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on Mahatransco E-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| Sr. No. | Particular of Works | SRM E-Tender No. | SRM E-Tender RFx No. |
|---|---|---|---|
| 01 | Conversion of SSN to DSN & STN to DTN for lines crossing NH, SH, River, roads of 220kV /132kV at EHV Lines under EHV O&M Division, Latur. | SE/EHVC/PV/TS/2025-26/T-16. | 7000037859 |

For further details visit our Website **https://srmetender.mahatransco.in**.
**Contact Person:** The Executive Engineer(O): Phone No. (02446) 222076.
The undersigned reserves the rights to accept or reject any or all tenders without assigning any reasons thereof.

Sd/-
Superintending Engineer,
EHV (O&M) Circle, Parli-V

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादक: दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६